हीरकमहोत्सवी कोल्हापूर चित्पावन संघाचे मुखपत्र

स्थापना : १९६४

६०

# मासिक नवस्नेह

ब्रह्मतेजो बलंबलम्

वर्ष १० वे : अंक ६
सप्टेंबर २०२४

स्वागतमूल्य
₹. 30/-



प्रेषक
**कोल्हापूर चित्पावन संघ (रजि.)**
४२८, बी वॉर्ड, तुळजाभवानी संकुल, गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ,
कोल्हापूर ४१६ ०१२. फोन : ०२३१-२५४६२२५, मोबा. ७६२०५४६२२५
Visit us on www.kolhapurchitpavan.com
ईमेल : kolhapurchitpavan@gmail.com
https: //www.facebook.com/kolhapurchitpavan

**हीरकमहोत्सवी कोल्हापूर चित्पावन संघाच्या वतीने**

# गुरुवार दि. १० ऑक्टोबर २०२४ रोजी श्रीमहालक्ष्मी अष्टमी जागर सोहळ्याचे आयोजन

कोल्हापूर चित्पावन संघाच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही **'श्रीमहालक्ष्मी अष्टमी जागर सोहळा'** व **'महाप्रसाद' गुरुवार, दि. 10 ऑक्टोबर 2024 रोजी ब्राह्मण सभा, करवीर, मंगलधाम येथे** साजरा करणेचे योजिले आहे.

आपल्या कुटुंबातील किती सभासद प्रसादासाठी येणार आहेत याची नोंद संघाचे कार्यालय व श्री परशुराम पतसंस्था येथे प्रत्यक्ष भेटून अथवा फोन, व्हॉटस्ॲपवरून (7588839527) करावी. ज्यायोगे महाप्रसादाचे योग्य नियोजन करणे सोयीचे होईल. सर्व ज्ञातीबांधव, शिस्तप्रिय असल्याने कार्यक्रमाचे योग्य नियोजन, महाप्रसाद करण्यासाठीची पूर्व तयारी, संभाव्य अपव्यय व गैरसोय टाळणे हा यामागील मुख्य उद्देश आहे. त्यादृष्टीने सर्वांनी आगाऊ नोंदणी करणे आवश्यक व अपेक्षीत आहे.

गतवर्षीप्रमाणे यावर्षीही सोयीचे दृष्टीने 'महाप्रसाद पास' योजना करणेचे निश्चित केले आहे. आपण चित्पावन संघ, श्री परशुराम पतसंस्था येथे महाप्रसादासाठी नोंदणी करून पास घेऊ शकता. तसेच संघाचे सर्व संचालक, सल्लागार व खाली दिलेल्या महिला प्रतिनिधी यांचेकडे नांव नोंदणी करून पास घेऊ शकता. दूरवर राहणारे ज्ञातीबांधव फोन करून देखील महाप्रसाद नोंदणी करू शकतात. त्यांना कार्यक्रमावेळी पास देण्याची व्यवस्था केली जाईल. नोंदणी व पास ही संकल्पना महाप्रसाद नियोजनासाठी राबविण्यात येत आहे, याची कृपया नोंद घ्यावी. आपण सहकार्याचा हात दिल्यास एक आदर्श महाप्रसाद नियोजन संपन्न होईल, याची आम्हांस खात्री आहेच.

वशेळ्यांनी आपली नोंदणी कोल्हापूर चित्पावन संघ व श्री परशुराम पतसंस्था व महिला प्रतिनिधी यांचेकडे प्रत्यक्ष, फोनवरून अथवा व्हॉटस्ॲपद्वारे करावी. त्याची **नोंदणी फी रु. 251/- प्रत्येकी** आहे याची नोंद घ्यावी.

अष्टमी जागर निमित्ताने आयोजित महाप्रसादासाठी सुमारे 1000 ज्ञातिबांधव सहभागी व्हावेत यादृष्टीने नियोजनाची आखणी करीत आहोत. महाप्रसादासाठी ज्ञातीबांधवांनी सढळ हाताने देणगी द्यावी. महाप्रसादासाठी लागणाऱ्या शिधाखर्चाची यादी दिली आहे. रोख रक्कम स्वरुपात देणगी दिल्यास आम्हाला संयुक्तपणे शिधा आणणे सोयीचे होईल. नियोजनाचे दृष्टीने आपण शिधाखर्च रोख अथवा पुढे दिलेल्या पर्यायांनी जमा करू शकता. अधिक माहितीसाठी संबंधितांनी **कोल्हापूर चित्पावन संघ, फोन 0231-2546225/2991673, मोबा. 7620546225 व श्री परशुराम नागरी सह.पतसंस्था मर्या., कोल्हापूर मोबा. 8857076163 येथे संपर्क साधावा.**

**अधिक माहितीसाठी महिला प्रतिनिधींशी संपर्क साधावा.**

सौ. सीमा सुरेश गोखले (9420455159), सौ. संगीता संजय आपटे (8149480034), सौ. अर्चना मोहन दातार (9637248908), सौ. अश्विनी प्रसाद भिडे (9623674742), सौ. पंकजा गोरे (9421100047), सौ. माधुरी मकरंद करंदीकर (9765651169), सौ. अपूर्वा केळकर (9657865339)

तसेच ज्या व्यक्तींना बँकेमध्ये पैसे पाठवायचे आहेत त्यांनी संस्थेच्या पुढील खात्यात रक्कम जमा करावी त्याचा स्क्रीन शॉट पाठवावा. कृपया बँकेत पैसे जमा केल्यास रिमार्क जागेत आपले नाव अवश्य लिहावे.

**बँकेचे नाव - युनियन बँक ऑफ इंडिया, बँकेची शाखा - महाद्वार रोड, कोल्हापूर, खाते नंबर - 641002050000001, IFSC Code - UBINO564109, गुगल पे नंबर - कार्यवाह - श्री. केदार जोशी (7588839527)**

## श्री महालक्ष्मी अष्टमी जागर सोहळा - कोल्हापूर चित्पावन संघातर्फे घरपोच प्रसाद योजना

आपल्या संघाच्यावतीने गुरुवार, दि. 10 ऑक्टोबर 2024 रोजी दाते पंचांगानुसार अष्टमी जागर सोहळा आयोजित केला आहे. सध्याच्या परिस्थितीत अनेक भाविकांना दर्शनासाठी येणे शक्य होत नाही. विशेषत: घरातील ज्येष्ठ मंडळी, लहान मुले, गर्भवती महिला आदि कुटुंबातील सदस्य इच्छा असूनही येऊ शकत नाहीत. यासाठी आपल्या संघाच्या वतीने 'श्री' चा प्रसाद आपल्या घरी पोहोचविण्याचा संकल्प केला आहे. यामध्ये हळद-कुंकू, लाडू, फुटाणे, सुरक्षित पिशवी यांचा समावेश आहे. तसेच आपल्या कुटुंबाच्या कल्याणासाठी संकल्प केला जाईल. यासाठी आपण रविवार, दि. 6 ऑक्टोबर 2024 पर्यंत नोंदणी केल्यास प्रसाद आपल्या घरी शनिवार, दि. 12 ऑक्टोबर 2024 पासून 4-5 दिवसांत कुरिअरने घरपोच मिळेल. यासाठी एका प्रसादासाठी देणगी शुल्क केवळ रु. 351 देण्याची विनंती करीत आहोत. आपण 1) ज्याच्या नावे प्रसाद घरपोच हवा असेल त्याचे संपूर्ण नाव, पत्ता, व्हॉटस्ॲप नंबर, 2) गोत्र व प्रसादाची संख्या ही माहिती कळवावी. देणगी शुल्क रोखीने संघाच्या कार्यालयात किंवा श्री परशुराम पतसंस्थेच्या कार्यालयात अथवा संघाच्या अधिकृत बँक खात्यात जमा करू शकता.

## कोल्हापूर चित्पावन संघाचे मुखपत्र

# नवस्नेह

**वर्ष १० वे : अंक ६ : सप्टेंबर २०२४**

- **संपादक** श्री. सदानंद दिनकर मराठे
- **कार्यकारी संपादिका** प्रा.सौ. मंजुश्री गोखले 8805355200
- **सल्लागार** सौ. पल्लवी देशमुख 9420455984


### अनुक्रम


१) **संपादकीय /४**

२) **भ्रमनिरास /५**
– सौ. कमल हर्डीकर

३) **माझी बँकेतील मुशाफिरी /९**
– शब्दांकन : श्रीकांत शिंत्रे, सौ. ज्योत्स्ना शिंत्रे

४) **मुलांचे पान /१२**

५) **ज्ञानसूर्याची सावली /१४**
– सौ. मंजुश्री गोखले

६) **सोपानदेवांची 'अलौकिक सोपानदेवी' /१७**
– सौ. मंजुश्री गोखले

७) **हिंदूधर्मरक्षक विचारवंतांची द्विजन्मशताब्दी /१८**
– प्रकाश देशपांडे

८) **समतोल कृष्ण /२०**
– विकास शहा

९) **मुस्लिम स्त्री कलाकार /२१**
– प्रकाश गानू

१०) **वधूवर माहिती यादी /२५**



- **मुद्रण स्थळ** मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स, १३०५, ए, शिवाजी पेठ, कोल्हापूर. मोबा. ९९२१६६९६६६
- **अक्षरजुळणी** ज्योती अरुण काटवे, विराज कॉम्प्युटर सर्व्हिसेस, कोल्हापूर. मोबा. ९०२१२३४८९०




हीरकमहोत्सवी

## कोल्हापूर चित्पावन संघ

मंगळवार पेठ, फोन : ०२३१-२५४६२२५
०२३१-२९९१६७३, मोबा. ७६२०५४६२२५


- **संचालक मंडळ**

**श्री. मकरंद विष्णू करंदीकर** (अध्यक्ष) 9421113005
**श्री. प्रसाद प्रभाकर भिडे** (उपाध्यक्ष) 9822248500
**श्री. केदार वसंत जोशी** (कार्यवाह) 7588839527
**श्री. संतोष वसंतराव साने** (सहकार्यवाह) 8459019091
**सौ. संगिता संजय आपटे** (खजिनदार) 8149480034

- **संचालक**

श्री. सदानंद दिनकर मराठे 0231-2541823
सौ. सीमा सुरेश गोखले 9420455159
श्री. हृषिकेश भालचंद्र लिमये 9404260470
श्री. किरण विनायक जोशी 9890003810
श्री. श्रीकांत अनंत लिमये 9423980380
श्री. दत्तात्रय वामन आपटे 9422043366

- **तज्ञ सल्लागार**

श्री. प्रसाद खाडिलकर 9822084305

- **सल्लागार**

श्री. विष्णू दिनकर वझे 9637255984
श्री. मोहन मधुकर दातार 9881874701
श्री. शिरीष श. ताम्हनकर 9422590025
श्री. निनाद खरे 7057151549
श्री. महेश खाडिलकर 9422046611



**कामकाजाची वेळ**
**सकाळी १० ते सायंकाळी ६ (साप्ताहिक सुट्टी नाही)**


या अंकातील लेखातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.



**'नवस्नेह' मासिकाची ठेव, वर्गणी अगर इतर कोणत्याही पेमेंटसाठी 'कोल्हापूर चित्पावन संघाचे' खात्यांची माहिती पान क्र. ८ वर दिली आहे.**

# संपादकीय...



नमस्कार मंडळी !

**ॐ नमोजी आद्या । वेद प्रतिपाद्या ।**
**जय जय स्वसंवेद्या । आत्मरूपा ।।१।। ज्ञानेश्वरी।।**
**आद्य रूपा तुज नमन । वेद ज्यांस करतो वंदन ।**
**स्वयं प्रत्यय जो जाण । आत्मरूप तो ।। ज्ञानाई ।।**
**देवा तूचि गणेशू । सकल मति प्रकाशू ।**
**म्हणे निवृत्ती दासू । अवधारिजो जी ।।२।।ज्ञानेश्वरी।।**
**देवा तू श्री गणेश । ज्ञान बुद्धीचा देई प्रकाश ।**
**मी निवृत्तीचा दास । मजकडे लक्ष द्यावे ।।ज्ञानाई।।**

तुम्ही म्हणाल हे काय नवीन? तर माउलींच्या ज्ञानेश्वरीचा अत्यंत सोप्या मराठीत, काव्यात्मक यमक साधून केलेला 'ज्ञानाई' हा ओवीबद्ध अनुवाद जो माऊलीनं अक्षरश: माझ्याकडून लिहून घेतला आहे ! 'ज्ञानाई' हा माझा ग्रंथ सकाळ प्रकाशनतर्फे लवकरच प्रकाशित होणार आहे. तुमचे सर्वांचे आशीर्वाद आणि शुभेच्छा पाठीशी असूद्यात. श्री गणेश चतुर्थीच्या निमित्ताने 'ज्ञानाई' ची ही एक झलक ! असो.

मित्रांनो श्रावण आला, निघाला सुद्धा...

**क्षणांत येते सरसर शिरवे**
**क्षणांत फिरुनी ऊन पडे**

असं देखणं रूप मिरवणारा श्रावण येतो आणि तो येताना सण, उत्सव, व्रतवैकल्ये घेऊन येतो. तसा आता गणेशोत्सव दारातच आहे, म्हणून माऊलीनं केलेले गणेशाचं वर्णन ज्ञानाईतून दाखवलं.

आपला नवस्नेहचा हा सप्टेंबरचा अंक. आता पुढचा अंक हा दिवाळी अंक असणार आहे. त्याच्या तयारीला आम्ही लागलोच आहोत. नेहमीसारखाच तो अंक देखणा आणि वाचनीय असणार याची ग्वाही संपादक म्हणून मी तुम्हाला देते. अर्थात तुमचंही लेखन त्यात अपेक्षित आहेच. देताय ना मग? आणि अंकाच्या दर्जेदारपणासाठी आम्हा संपादक मंडळावर विश्वास ठेवणार ना? असो !

बाप्पा तर आलेत. हिंदू धर्मातली आद्य देवता असा गणेशाचा उल्लेख होतो. आपण तो सण, उत्सव म्हणून साजरा करतोच, पण... पण भीती वाटतेय आणखी किती वर्ष? आता या प्रश्नाचं उत्तर बाप्पानेच द्यायचं आहे. सध्या तरी पाऊस उघडला आहे. पण नवीन पाणी, प्रदूषित आणि सतत बदलणारे हवामान यामुळं तब्येती सगळ्यांच्या बिघडताहेत. (माझी तर बिघडली होतीच) पण सांभाळून रहायला हवं. आपण नागरिक तंदुरुस्त तर देश तंदुरुस्त ! आता गणेशोत्सव साजरा करताना हेही भान ठेवायला हवं. हवेचं प्रदूषण आणि प्रचंड ध्वनी प्रदूषण ! खरं तर संगीत, वादन, कला ही आनंददायी आहे, असायला हवी. पण आमचा उत्साह इतका ओसंडत असतो ना की डी.जे. आणि डॉल्बी लावल्याशिवाय तो व्यक्तच होत नाही असं आम्हाला वाटतं. पण खरं सांगू?

**दुनिया का सबसे सुंदर म्युझिक**
**आपकी अपनी हार्टबीट है ।**
**इसे ईश्वर ने खुद कंपोज किया है ।**
**इसलिए इसे शांतीसे सुने ।।**

हे खरं ! त्यामुळं डी.जे. आणि डॉल्बीमुळं हार्टबीट फार वाढणार नाहीत याची काळजी घ्या. या सूचनेसोबतच गणेशोत्सवाच्या मंगलमय शुभेच्छा !

धन्यवाद !

आपली स्नेहांकिता,
**सौ. मंजुश्री गोखले,**
मो. ८८०५३५५२००

**नवीन तहहयात सभासद होण्याची संधी**

**संघाची सभासद वृद्धी योजना सुरू झाली असून या योजनेत रु. २६०/– मध्ये तहहयात सभासद होण्याची संधी मिळणार आहे. तरी ज्ञाती बांधवांनी या सुवर्णसंधीचा फायदा घ्यावा.**

# भ्रमनिरास

## (लेखांक ८)

सुजाता तशी अबोलच. घरातील तिचा नवरा सुयश आणि दोन मुली सोडल्यास इतर कुणाशी कामाव्यतिरिक्त आपणहून आणि तेही आस्थेवाईकपणे न बोलण्याचा सुजाताचा स्वभाव. पण कोणत्यातरी वेगळ्या आणि बरेच दिवस गुंतून रहायला लागणाऱ्या प्रसंगात तिला जेव्हा भाग घ्यायला लागत असे, तेव्हा सुजाताचं प्रत्येकाशी आपलेपणानं, आस्थेवाईकणे बोलणं सुरू व्हायचं. सुजाताच्या या स्वभावाचं निरीक्षण आणि अनुभव सुमनने अनेक वेळा घेतला होता. सुजाताची धाकटी बहीण घरातून पळून गेली होती. ती जवळजवळ सोळा दिवसानंतर लग्न करून नवऱ्यासह घरी परत आली होती. सुजाताच्या भावानं काढलेल्या कर्जापायी बँकेची जप्ती येईल या तणावांतून पूर्ण बाहेर येण्यास एका महिन्याहून अधिक कालावधी लागला होता. त्या प्रसंगी सुजातासह तिच्या माहेरची सर्व माणसे अगदी बेचैन होती. अगदी नुकताच सुजाताच्या भावाचा मुलगा उच्च शिक्षणासाठी अमेरिकेला जाण्याकरता अगदी कसोशीने प्रयत्न करत होता. तीन महिन्यांच्या अथक प्रयत्नानंतर तो यशस्वी झाला. या सर्व प्रसंगी सुजाताच्या वागण्या-बोलण्यातला बदल सुमनला अगदी स्पष्ट आठवत होता. त्यामुळेच आता सुजाताचं बदललेलं वागणं नेमकं कशा प्रसंगामुळे, कोणत्या घटनेमुळे असेल असा प्रश्न सुमनला पडला होता.

''सुमनताई, तुम्हाला अळूवड्या खूप आवडतात. आज संध्याकाळी करू का?' या सुजाताच्या प्रेमळ प्रश्नाने सुमन भानावर आली. गेल्या आठ-पंधरा दिवसातले असेच संवाद सुमनला आठवू लागले. 'अरे शरद, सतीश शाळेतून आल्यावर दूध आणि खाणं देण्यासाठी आजी किंवा आत्याला कशाला हाक मारता? मी असते ना घरात?' चार-पाच दिवसांपूर्वीच नेहमीप्रमाणे ताई जेव्हा भाजी आणण्यासाठी निघाल्या होत्या, त्यावेळी सुजाताची वाक्यं सुमनला आठवली.

'अहो ताई नुसत्या चालून येत जा ना. भाजी कशाला आणत बसता ! मी किंवा दुसरं कोणी आणेल ना !' रेखा ऑफिसमधून येण्याच्या वेळी सुजाता तिच्या खोलीत तरी असायची किंवा बाहेर गेलेली असायची. परंतू गेले पंधरा-वीस दिवस ती क्वचित रेखाला चहा करून द्यायची आणि एक दिवस तर ती म्हणत होती, 'रेखाताई, अहो ऑफिसमधून आल्यावर चहा पिऊन जरा निवांत बसत जा आणि त्यानंतर मग संध्याकाळच्या स्वयंपाकाला लागत जा ना !'

हे असे संवाद सुरेश-रेखा हे घर सोडून दुसरीकडे रहायला जायचे अगदी नक्की करेपर्यंत होत राहणार याची जाणीव सुमनला झाली. त्यानंतर पुन्हा ये रे माझ्या मागल्या. सुजाताच्या या वागण्याचे रहस्य सुजाताकडून सुरेशचा मुलगा शरद याला चुकून पाठविल्या गेलेल्या व्हॉटस्‌ॲप मेसेज वाचताक्षणीच समजले होते. त्या मेसेजमध्ये म्हटल्याप्रमाणे सुरेश आणि रेखाला हे घर सोडण्यास भाग पाडण्यासाठी हाती घेतलेल्या मोहिमेची व्याप्ती वाढवण्याचे काम खुद्द सुजाता आणि तिच्या मित्र मंडळींकडून हाती घेतल्याची प्रचिती अनेक प्रसंगातून लगेचच येत होती.

एक दिवस संध्याकाळी ताई, सुमन, आत्या आणि तिची चारही भाचेकंपनी हास्य विनोदात गर्क होती आणि सुजाताची धाकटी मुलगी श्वेता हिने एकदम प्रश्न विचारला –

'ए शरददादा, आमची आई म्हणत होती, तुझ्या आई-बाबांची वर असलेली बेडरूम आमचे आई-बाबा वापरणार आहेत. म्हणजे मग काका-काकू खालच्या बेडरूममध्ये येणार का?'

या प्रश्नाचं उत्तर केवळ खांदे उडवून देणंच शरदनं पसंत केलं. कारण सुजाता काकू असं का बोलली हे त्याला चांगलंच माहित होतं. ते खरं कारण शरद सध्यातरी श्वेताला सांगू शकत नव्हता. चार-आठ दिवसांच्या कालावधीत रेखाला तिचे मामा आणि मावस बहिण यांचेही फोन आले. फोनवर मामा

म्हणत होते –

'रेखा, तुमची खुशाली समजून घेण्यासाठी फोन केला.' यावर रेखा म्हणाली –

'मामा खुशाली वगैरे काही नाही. तुमच्याकडे सुरेशचे मित्र आहात असं सांगत कुणीतरी आले असतील. त्यांच्या बोलण्याने अस्वस्थ होऊन मामा तुम्ही फोन केलात. खरं ना? मामा आम्ही खरोखरीच या घरातून दुसरीकडे रहायला जाणार आहोत. यामागचं खरं कारण – शरद, सतीश आता मोठे झालेत. त्यांना हल्लीच्या इतर मुलांप्रमाणे स्वतंत्र खोली हवी ना? केवळ या कारणासाठी तीन बेडरूमचा फ्लॅट आम्ही घेतला आहे. पंधरा-वीस दिवसांत तिथे रहायला जाऊ. आम्ही सर्वजण छान आहोत. अगदी खुशाल आणि आनंदात आहोत.' असे म्हणत रेखाने फोन ठेवला.

रेखाच्या मावसबहिणीच्या फोनची सुरुवातच 'काय गं रेखा, तुम्ही दुसरीकडे रहायला जाताय म्हणे!'

रेखा – 'तुला कसं कळलं?'

बहिण – 'अगं ती गंमतच झाली बघ. तुझ्या सुजाता-सुयशचे दोन मित्र आमच्याकडे आले होते. त्यांनी येण्याचं कारण काय सांगितलं तर आमचं आऊट हाऊस किंवा बंगल्याचा वरचा मजला किंवा तुमच्या माहितीत इथे आसपास कुणाची जागा भाड्याने द्यायची आहे का? अशी चौकशी करण्यासाठी ते आले होते. मला पाहिल्यावर ते म्हणाले, 'तुम्ही रेखा वहिनींची बहिण ना? तुम्ही आम्हाला ओळखत नाही, पण आम्ही तुम्हाला ओळखतो. कारण सुरेश आमचा मित्र आहे. खरं तर सुरेश-रेखालाच जागा पाहिजे आहे.' असं म्हणून ते दोघे बाहेरच्या बाहेर निघूनही गेले. यासाठीच मी तुला फोन केला. दुसरीकडे रहायला जाण्याचं मामांना सांगितलेलं कारण सांगूनच रेखाने फोन बंद केला.

या साऱ्या गोष्टींचा सुरेश आणि रेखाला विलक्षण मनस्ताप झाला. बापूंच्या इच्छापत्राच्या वाचनानंतर सुजाताची मुक्ताफळं ऐकल्यानंतर सुरेशनं या घरातून लौकरात लौकर बाहेर पडायचं असा निर्णय घेतला होता. त्यादृष्टीनं तो पावलंही उचलत होता. पण सुजाताला थोडाही धीर नव्हता. पण आपला हेतू साध्य करण्यासाठी सुजातानं निवडलेला मार्ग अत्यंत निंद्य आणि गलिच्छ होता. आपला नवरा सुयश याला पूर्णपणे अंधारात ठेवून सुजाताने परक्या, बाहेरच्या माणसांकरवी सुरेश-रेखाचा जो अपमान केला तो निश्चितच माफ करण्याजोगा किंवा विसरण्यासारखा नव्हता. याचा खरंतर खूप मानसिक धक्का सुरेशला बसला होता. यातून बाहेर पडण्यासाठी अनेक उपचारांच्या साहाय्यामुळे काही कालावधीनंतर तो मुक्ततेच्या मार्गावर आला. एक प्रकारची विचित्र, मनाला वेदना देणारी कटुता घेऊन घर सोडावं लागलं. नव्या घराची वास्तुशांत अगदी घरापुरती केली. ताई, सुमन आणि सुरेशचं चौघांचं कुटुंब एवढीच माणसं.

सुरेश-रेखाच्या नव्या घरात ताई आणि सुमन जवळजवळ तीन आठवडे राहून आपल्या घरी परत यायला निघाल्या त्यावेळी न राहवून सुरेश आईला म्हणाला, 'ताई, तू कायमच इथं माझ्याबरोबरच का रहात नाहीस? सुमनताई आणि तू दोघींच्याशिवाय राहणं मला खूप जड जाणार आहे.' यावर सुमन म्हणाली, 'सुरेश भावनाप्रधान होऊ नकोस. व्यावहारिक पातळीवरही विचार कर. तीन आठवडे झाले आम्ही तुझ्याकडे आहोत. या कालावधीत माझं राहू दे, पण सुजाताचा एकही फोन ताईला आला नाही. तुम्ही कशा आहात? इकडे कधी येणार आहात? अशी वरवरची चौकशी करणारा फोनही तिने केला नाही. मी आणि ताईपण ते घर सोडून कायमच्या बाहेर पडलो तर सुजाताला तेच पाहिजे आहे. आम्ही अधून मधून चार दोन दिवस तुझ्याकडे नक्कीच येऊ, पण कायमचं बाहेर पडणं म्हणजे तिच्या हातात कोलीत दिल्यासारखंच होईल.

दिवस जात होते. सुरेश-रेखा आणि शरद, सतीश हे सर्वजण नसताना घरी राहणं ताईच्या अंगवळणी पडू लागलं होतं. जेमतेम महिना उलटला असेल. आम्ही दोघीजणी तुला भेटायला येणार आहे. दोन-तीन दिवस राहून परत जाऊ, असा ताईंच्या मामेबहिणीचा फोन आला. कळवल्याप्रमाणे ताईंच्या बहिणी लिला आणि प्रभा दोघींजणी आल्या. आलेल्या दिवशी ताईकडे राहून दुसऱ्या दिवशी

संध्याकाळी सुमन, ताई, लिला आणि प्रभा सुरेशकडे गेल्या. संध्याकाळचा चहा, रात्रीची जेवणं, त्यानंतर कॉफी आणि मग रात्री एक वाजेपर्यंत जुन्या आठवणींचा ओघ थांबता थांबेना. सकाळी उठून चहा आणि त्यानंतर भरपेट नाष्टा करून चौघीपण परत घरी आल्या. घरी आल्यावर पुन्हा गप्पांचा फड. दिड वाजला. आता जेऊ या म्हणून सुमन उठली. ती पाने मांडणार तोच कुरिअर आलं म्हणून सुमन बाहेर गेली. ताईंनी पाच ताटे ठेवली.

सुजाताचा प्रश्न - 'पाच ताटं का ठेवली? तुम्ही चौघीजणी आहात.' ताई म्हणाल्या, 'अगं सतीश आला आहे आमच्याबरोबर. ताही घासभर जेवेल.' यावर सुजाता फणकारली–

'हे बघा, घर माझं आहे. घरातलं स्वयंपाक–पाणी सगळं मी पाहते. असं आयत्यावेळी कुणाला आणण्यापूर्वी मला पूर्वकल्पना दिली पाहिजे.' ताई शांतच.

कुरिअर ठेवून आंत येताना सुमन 'चला जेवायला' म्हणून आवाज देतच आली. सतीश बसल्या जागेवरूनच ओरडला, 'अे आत्या, मी जेवणार नाही. संध्याकाळी घरी जाताना मोठा कप भरून दूध घेईन.'

ताईंनी एक ताट उचलून ठेवलं. सतीशच्या दूध पिण्यावरून पुन्हा वाद नको म्हणून त्यांनी सतीशला सांगितलं, 'तुला पिशवीतलं कोरं, गार दूध प्यायला आवडतं ना? मी नंतर पैसे देते. तुझ्यासाठी दुधाची एक पिशवी घेऊन ये.'

सुजाताचं बोलणं सुमननं ऐकलं नाही, पण लीलानं मात्र शब्दन् शब्द ऐकला होता. जणू काही वेगळं घडलंच नाही. इतक्या शांतपणे ताई जेवत होत्या. जेवणानंतर खोलीत गेल्यानंतर लीला ताईवर भयंकर चिडली. अशी कशी ग तूं? समोरची व्यक्ती काहीही बोलली तरी मुकाट्याने, चकार शब्द न बोलता ऐकून घेतेस. आजवरचं सगळं आयुष्य दबावाखाली काढलस. आयुष्याच्या अखेरीस तरी हा दबाव झुगारून दे. आपली मावशी एवढी का चिडली आहे हे समजून घेण्यासाठी सुमननं 'अगं एवढी का ताईवर रागावते आहेस?' म्हणून प्रश्न विचारल्यावर सुमनला मावशीने सर्व हकिकत सांगितली. हे सर्व ऐकून सुमनही ताईवर चिडली. 'अगं ताई, तुझ्या नवऱ्याची, आमच्या वडिलांची शेवटची इच्छा म्हणून का होईना हे दबलेपण सोड. हे घर बांधण्यासाठी तू आणि मीही रक्ताचं पाणी केलं आहे. आपल्या नवऱ्याच्या नावावर घर झालं म्हणून ही इतकी शेफारली. ताई कधीतरी बंड करून ऊठ.'

यावर ताई आवाज जराही न चढवता बोलू लागल्या, 'हे बघ, समोरच्याशी वाद घालायचा नाही. शब्दानं शब्द वाढवून वितंडवाद सुरू झाला तर राग आवरणं शक्य होत नाही. पण तेच आपण शांत राहिलो तर ती गोष्ट सरळ आणि एकमार्गी पार पडते हा माझ्या अनुभव आहे किंवा हा माझा भ्रम आहे असं समज. हा भ्रम इतक्या लवकर दूर होईल असं तू समजू नकोस आणि मलाही ते शक्य नाही. माझ्यात असलेला हा भ्रम ठोस कृती करून, शब्दाने नव्हे, दूर करायचा असं मी ठरवलं आहे.' हे ऐकून सुमन जोरजोराने हसत म्हणाली, 'अगं ताई, तुला कडक शब्द उच्चारता येत नाहीत आणि तू ठोस कृती करणार?' यावर ताई म्हणाल्या– 'हे बघ, आज ५ तारीख आहे. या महिन्याच्या तीस तारखेला चपराक बसेल असं उत्तर सुजाताला मिळेल.'

सुमन म्हणाली, 'ए, तुम्ही दोघीपण ऐका हं ! तीस तारखेला ताईच्या ठोस कृतीचा इतिवृत्तांत मी तुम्हाला पाठवीन.'

सहा तारखेला सकाळी दोन्ही मावशांची परत जाण्याची गडबड आणि त्याच वेळी लहान मोठं बांधकाम अगदी नीटनेटकं आणि अचूक करणारा दशरथ हजर झाला. ताईने त्याला पाच मिनिटं थांबायला सांगितलं आणि आपल्या बहिणींना निरोप दिल्यावर ताई दशरथला स्वयंपाकघराला लागून असलेल्या बाल्कनीत घेऊन गेली. जाताना चहा पीत असलेल्या सुयशला - आता कागदोपत्री घरमालक असलेल्या - आपल्या मुलाला बाल्कनी थोडी मोठी करून घेते हे सांगायला ती विसरली नाही. यावर सुयश म्हणाला, 'अगं ताई, मला कशाला सांगायला हवं? तुला पाहिजे ते तू कर ना.' बाल्कनी कोणत्या बाजूला आणि किती वाढवायची याचा ताईंनी पूर्ण

विचार केला होता. त्यांचा प्रस्ताव ऐकून दशरथ म्हणाला, 'एकदम झकास !'

मग आता वेळ घालवू नकोस. मापं घे. खर्चाचा अंदाज दे आणि लगेच कामाला सुरुवात कर. आज सहा तारीख, पंचवीस तारखेच्या आत काम पूर्ण झालं पाहिजे.

दशरथ – 'पंचवीस तारीख कशाला? त्याच्या बी अदुगर काम पूर्ण करू देतो. हा दशरथचा शब्द हाय.'

रोज संध्याकाळी ताई थोडा वेळ पाय मोकळे करायला बाहेर पडून येता येता भाजी, औषधे वगैरे आणत. मधल्या कालवधीत सजावटमध्ये जाऊन ताईंनी दोन मोठी कपाटं आणि लहान मोठ्या आकाराचे जाड प्लॅस्टिकचे डबेही पाठवण्यास सांगितले होते. त्यानुसार एकोणतीस तारखेला सर्व सामान आलं. दोन्ही कपाटं बाल्कनीच्या वाढीव भागात अगदी छान बसली. ताईचं काय चाललंय हे सुमनला समजत नव्हतं आणि विचारलं तर ताईही खुलासा करत नव्हत्या. तीस तारखेला सकाळी नेहमीप्रमाणे स्वयंपाकघरात बसून सर्व वाणसामान घरपोच करणाऱ्या राजाभाऊंना फोनवरून जिन्नसांची यादी आणि बरोबरच किलो, अर्धा, पावकिलो वगैरे सांगत होत्या. सुजाता स्वयंपाकघरातच असल्याने ती सर्व ऐकत होती. न राहवून ताईंना मध्येच थांबवत सुजाता म्हणाली,

'ताई, सगळे जिन्नस इतके कमी का मागवता आहात? पंधरा दिवसांसाठीच पुरेल असं मला वाटतंय. पुन्हा तेच तेच कशाला करायचं ना?' आवाज जराही न चढवता ताई म्हणाल्या –

'हे वाणसामान माझ्यासाठी आणि सुमनसाठी मागवत आहे. तुम्हा चौघांना लागणारं वाणसामान, भाजी, साबण वगैरे सर्व आता तूझं तू आणत जा. उद्यापासून माझा, सुमनचा स्वयंपाक तू करू नकोस. आमचा नाष्टा आणि स्वयंपाकासाठी बाई येतील. घरात भरपूर भांडी आहेत ती आम्ही वापरायला तुझी हरकत नसावी असं वाटतं. घरकाम करणाऱ्या मावशींचे पगार, वीज बील, पाणी बिल इ. रकमेचा योग्य वाटा दर महिन्याला तुम्ही देत जा. मी किंवा सूमन पूर्वीप्रमाणे येथून पुढे सर्वांचे पूर्ण पगार देऊ शकणार नाही. आणि हो, एप्रिल महिना संपला. घरफाळा भरला आहे की नाही याची चौकशी करून तीही रक्कम वेळेवर भरावी लागेल, नाहीतर दंड आकारला जाईल. सुयशच्या कानावर हे सर्व मी घालेनच. पण त्याला सांगण्याआधी तुला सांगितलं इतकंच.

ताई बोलत होत्या. सुजाता ऐकत होती. पण तिच्या आतपर्यंत किती गोष्टी जात होत्या हे तीच जाणे. दुरून थक्क होऊन सुमन ताईंकडे पहात होती. सुजाताच्या त्या बोलण्यावर इतक्या ठोस कृतीने ताई उत्तर देईल असे सुमनला वाटत नव्हते. उर्मटपणे बोलून आणि बारीक-सारीक गोष्टीत अडवणूक करून ताईंना कायमचं घराबाहेर काढता येईल. याबाबतचा निदान आज तरी सुजाताचा संपूर्ण भ्रमनिरास झाला.

◆◆◆

जोवर संसारी माणसाच्या मुलाबाळांचा गोतावळा त्याच्या स्थावर जंगम मालमत्तेची वाटणी इ. गोष्टी आहेत तोवर कुणाच्या ना कुणाच्या मनांत भ्रम निर्माण होणे आणि दुसऱ्याकडून भ्रमनिरास होणे हे सर्व अव्याहतपणे चालूच राहणार. पण आपण कुठंतरी थांबलंच पाहिजे ना? तेव्हा आता थांबूया.

**– सौ. कमला हर्डीकर,** मोबा. ९६८९३६९९२६


**कोल्हापूर चित्पावन संघासाठी आपल्या ठेवीची/वर्गणीची रक्कम**
**बँक ऑफ महाराष्ट्र, महाद्वार रोड शाखा**
खात्याचे नाव
**कोल्हापूर चित्पावन संघ**
**(खाते क्र. 20128506183)**
**IFSC Code : MAHB0000326**
**येथे पाठवा व KYC पाठवा. किंवा**
**बँक ऑफ इंडिया, शाखा : महाद्वार रोड,**
खात्याचे नाव
**कोल्हापूर चित्पावन संघ**
**(खाते क्र. 090210110016181)**
**IFSC Code : BKID0000902**
**येथे रक्कम पाठवून KYC पाठवा.**

# माझी बँकेतील मुशाफिरी

## (एका बँक अधिकाऱ्याचे विलक्षण अनुभव)

आपल्या देशात जेवढे म्हणून जिल्हे आहेत आणि प्रत्येक जिल्ह्यांमध्ये जेवढ्या म्हणून बँका आहेत, त्या त्या बँकांमध्ये त्या जिल्ह्यातील सर्व गावे वाटून दिलेली असतात. या बँकांवर त्यांना नेमून दिलेल्या गावांच्या आर्थिक विकासाची जबाबदारी देण्यात आलेली असते. माझ्या बँकेला अशी पंधरा गावे नेमून दिली होती.

मी एक एक करून या सगळ्या गावांना भेट द्यायला सुरुवात केली. प्रत्येक गाव छोटे- ५०/६० उंबऱ्यांचे-मुख्य व्यवसाय शेती - भात आणि ज्वारी ही दोन पिके होत असत. मी काही शेती अधिकारी नाही, ना माझी कुठे वडिलोपार्जित शेती. मी पक्का शहरी बाबू- जन्मापासून शहरात वाढलेलो - सुट्टीत सुद्धा कुठल्या गावाला जाणे नाही - ना स्वतःच्या, ना मामाच्या! पण तरीही मी या पिकांच्या अर्थकारणाचा अभ्यास सुरू केला. असे लक्षात आले की ज्वारीचे पीक घ्यायला जेवढा खर्च येतो, तेवढेच उत्पन्न पीक विकून मिळते, पदरी काही सुटत नाही. भाताच्या पिकामधून मिळणारे उत्पन्न मात्र खर्चापेक्षा जास्त असते. त्यामुळे ज्वारी फक्त पोटापुरती पिकवण्याकडे शेतकऱ्यांचा कल असे. भात शेती मात्र पुढे भात विकून पैसे मिळवण्याच्या उद्देशाने केली जात असे. दोन्ही पिके मान्सूनवर अवलंबून होती. याशिवाय जवळ जवळ दुसरे कुठलेच उत्पन्न नव्हते. ना दुग्ध व्यवसाय, ना भाजीचा मळा, ना बकरी पालन, ना कुक्कुट पालन !

चार पाच गावांमध्ये मात्र लोकांनी जवळच्या धरणामधून पाणी उपसा योजना Lift Irrigation Scheme कार्यान्वित केली. दूरगामी विचार ऊस घेण्याचा होता पण जवळपास साखर कारखाना नव्हता, सहकारी तत्वावर साखर कारखाना उभारण्याचे प्रयत्न चालू होते. तोपर्यंत भाजीचे मळे फुलवले होते. पण भाजीपाल्याचा धंदा मात्र बेभरवशी. आज टोमॅटोचे बाजारभाव चांगले आहेत म्हणून पीक घ्यावे, तर ते पीक हातात यावे तोपर्यंत टोमॅटोचे भाव इतके कोसळलेले असावेत की टोमॅटो बाजाराला घेऊन जाण्याचा वाहतूक खर्च पण निघू नये आणि म्हणून टोमॅटो रस्त्यावर फेकून द्यायची पाळी यावी.

कांद्यासारखे थोडेसे टिकाऊ पीक घ्यावे तर हंगामाच्या सुरुवातीला इतके कमी भाव असावेत की विशेष फायदा नाही आणि पुढे भाव मिळेल म्हणून पिकाची साठवणूक करून ठेवावी तर साठवणुकीची व्यवस्था नाही अशी परिस्थिती होती. हे बघून मला असे वाटू लागले - उत्तम शेती, मध्यम व्यापार, कनिष्ठ नोकरी याऐवजी असे म्हणावे, उत्तम नोकरी, मध्यम व्यापार, कनिष्ठ शेती !

खरे म्हणजे ही सुधारित म्हण आजही छोट्या शेतकऱ्यांबाबत लागू पडते. म्हणून आजही लोकांचा ओघ पोटापाण्याकरता नोकरी करण्यासाठी गावाकडून शहराकडे वाहत आहे. गावामध्ये कितीतरी शेती ओसाड पडली आहे. असो.

जर गावांमध्ये पूरक व्यवसाय निघाले तर कदाचित लोकांना गावाकडून शहराकडे यायची जरूर पडणार नाही. पण लक्षात कोण घेतो ? असो.

आमच्या बँकेने दोन लिफ्ट इरिगेशन स्कीम योजना राबवल्या होत्या. त्यापैकी एक योजना व्यवस्थित चालू होती, पाणी पुरवठा व्यवस्थित होत होता. परंतु दुसऱ्या योजनेद्वारा मात्र पाणीपुरवठा व्यवस्थित होत नव्हता. असे का ? याचा मी अभ्यास करू लागलो.

प्रथम लिफ्ट इरिगेशन स्कीम म्हणजे काय हे मला वाचकांना सांगावेसे वाटते. लिफ्ट इरिगेशन स्कीम म्हणजे पाणी उपसा योजना. धरणातून पाणी उपसून ते पाईपद्वारे शेतीला पुरवायचे. अशी ही

योजना असते. पाटबंधारे खात्याकडून हे पाणी उपसायला परवानगी घ्यायला लागते. ती साधारणपणे आठ माही  मिळते. या पाण्यावर दुबार पीक घेता येते.

मी ज्या  लिफ्टमधून पाणी पुरवठा होत नव्हता त्या स्कीमचा सखोल अभ्यास सुरू केला. ज्या ठिकाणाहून धरणातून पाणी पुरवठा होत होता तिथपर्यंत पोहोचलो. तेव्हा माझ्या लक्षात आले कि धरणाच्या आतमधून पाणीपुरवठा होत नव्हता तर धरणाबाहेरून, धरणाच्या भिंतीतून जे पाणी झिरपते त्यातून पाणी उपसा होत होता, हे पाणी पुरेसे नव्हते. एकूण शेतीचे क्षेत्रफळ विचारात घेता आणि पाईपचा आकार लक्षात घेऊन, जर धरणाच्या आतमधून पाणी उपसा करण्याची परवानगी मिळाली तर पुरेसा पाणी पुरवठा होणे शक्य होते.

जर पाणी पुरवठाच नाही तर ! तर दुबार पीक कुठून घेणार? आणि उत्पन्न कसे वाढणार? आणि बँकेचे कर्ज कसे फिटणार?

मी संबंधित शेतकऱ्यांची मीटिंग लावली. सुचवले की आमदार साहेबांवर दबाव आणून धरणाआतून  पाणी उपसा  करण्याची परवानगी मिळवा. शेतकऱ्यांनी मी सांगितल्याप्रमाणे कारवाई केली. त्यांना पाहिजे असलेली परवानगी मिळाली. पुरेसा पाणी पुरवठा होऊ लागला. दुबार पीक घेता येऊ लागले. उत्पन्न वाढले. बँकेच्या कर्जाचा हप्ता नियमित येऊ लागला !

मी ज्यावेळी ग्रामीण भागात काम करत होतो तेव्हा महाराष्ट्र सरकारने शेतकऱ्यांकरिता कर्जमाफी योजना जाहीर केली होती. मुख्यतः पीककर्ज माफ होणार होते. परंतु शेतकऱ्यांचा असा गैरसमज झाला की त्यांना आता कुठल्याच बँकेचे कुठलेच कर्ज भरायची जरूर नाही. सर्व कर्ज सरकारच भरणार. वास्तविक आम्ही दिलेली कर्जे पीककर्ज नसल्यामुळे कर्जमाफी योजनेत बसत नव्हती. पण शेतकऱ्यांनी हप्ते देणे पूर्णपणे थांबवले. ही एक मोठी समस्याच निर्माण झाली !

खूप विचार करून मी एक धोरण आखले- एकतर सगळ्यांना पत्र लिहायचे आणि दुसरे म्हणजे प्रत्यक्ष जाऊन भेटायचे.

पत्र कर्जदाराला समजेल अशा भाषेत, मराठीत लिहायचे. सगळ्यांशी सल्लामसलत करून मी एक पत्राचा तर्जुमा बनवला. साधी, सोपी, सरळ भाषा वापरली. शिवाय कर्जफेडीचे भावनिक आवाहन केले. मी सगळ्यांना पत्र पाठवायला सुरुवात केली. बरेचसे शेतकरी जरी अशिक्षित होते, तरी त्यांची मुले-मुली शाळेत जात होती. बँकेचे पत्र वाचून त्याचा अर्थ ते आपल्या आई-वडिलांना सांगत. परिणामतः थोडी थोडी वसुली सुरू झाली.

दुसरे म्हणजे मी सगळ्या गावांना भेट द्यायला सुरुवात केली. मी दिवेलागणीच्या सुमारास जात असे. त्यामुळे सगळे शेतकरी भेटत असत. गावातल्या देवळात सभा लावत असे. समजावून सांगत असे - तुमचे हित कर्ज फेडण्यात आहे. बँकेचे कर्ज स्वस्त असते. एकदा कर्ज फेडले तर परत मिळू शकते. शिवाय मारवाड्यासारखी बँक रात्री बेरात्री दारावर गुंड घेऊन उभी रहात नाही ----

बँक म्हणजे सोन्याचे अंडे देणारी कोंबडी आहे. कर्ज न फेडून तुम्ही ही सोन्याची अंडी देणारी कोंबडीच मारून टाकू नका, वगैरे वगैरे.

या मीटींगचा खूप उपयोग झाला. चांगली वसुली होऊ लागली. एकाने पैसे दिले की दुसरा देत असे, दुसऱ्याने दिले की तिसरा - Herd Mentality!

शेतकऱ्याकडे उत्पन्न एकदाच येते. जेव्हा तो कापणी करून धान्य विकतो तेव्हा. त्यावेळेस जर आपण त्याला गाठले तर आपल्याला पैसे भरपूर मिळण्याची शक्यता असते. मी सर्व गावांच्या सरपंच/प्रमुख लोकांशी मैत्रीसंबंध जोडले होते. ते आमच्या शाखेच्या गावाला, बाजारहाट निमित्त येत असत . त्यांना बँक आपली वाटावी म्हणून बँकेमध्ये मी गावासारखे पानसुपारीचे तबक ठेवीत असे. म्हणजे बँकेत आल्यावर, पानसुपारी घेऊन त्यांना घरच्यासारखे वाटेल आणि ते मोकळे होतील. ही

माणसे जेव्हा बँकेत येत असत तेव्हा आपणहून मला कापणीचा दिवस, कुणाचे किती पीक आले आहे, याची साद्यन्त माहिती देत असत. त्यामुळे अगदी योग्य वेळी मी गावांमध्ये जाऊन शेतकऱ्यांना गाठत असे, त्यामुळे आमची वसुलीही चांगली होत असे.

एका गावाला भेट देताना त्या गावच्या गोबर गॅस प्लॅन्टचे प्रकरण समोर आले. वास्तविक गोबर गॅस ही एक चांगली संकल्पना आहे, पण ज्या कुठल्या एजन्सीने ही योजना गावात राबवली होती तिने फक्त कमिशन घेऊन काहीतरी अर्धवट काम केले होते, एकही प्लांट चालू नव्हता. एजन्सीने तर गावातून पोबारा केलाच होता. शेतकऱ्यांचे स्वतःचे घातलेले पैसे तर बुडालेच, पण बँकेचे कर्ज मात्र त्यांच्या बोकांडी बसले होते. ही वसुली करताना खूप वाईट वाटायचे, पण इलाज नव्हता. शेतकऱ्यांनीच ही एजन्सी नेमली होती आणि बँकेने फक्त पैसे दिले होते. शेतकऱ्यांची पूर्ण फसवणूक झाली होती. हे विचारात घेऊन बहुतेक खात्यांमध्ये व्याज माफ करून उरलेले पैसे भरून घेतले.

एका प्रकरणात एका कर्जाला, गावचा पुढारी, जो पूर्वी भूतपूर्व मंत्री होता, तो जामीन होता. कर्ज वसूल होत नव्हते. मी कर्जदार आणि पुढारी – दोघांना नोटीशी पाठवल्या. पुढाऱ्याला राग आला. तो दमदाटी करू लागला. मी स्पष्ट केले, मी फक्त बँकेची वसुली करत आहे आणि मला कुणी अडवू शकत नाही. पुढाऱ्याला असेही सांगितले, की तुला पाहिजे ते तू कर, मोर्चा आण, माझ्या वरिष्ठांना फोन कर वगैरे वगैरे. पुढारी गप्पच झाला. गपगुमान कर्ज वसूल झाले. पण यामध्ये खबरदारी म्हणून मी आमच्या घरमालकाशी– जो विरोधी पक्षनेता होता, त्याच्याशी बोलून ठेवले होते आणि त्याने मला आश्वस्त केले होते!

एकदा एका खातेदाराने, मी ब्राह्मण आहे आणि कर्ज देण्यात पक्षपात करतो असा आरोप केला. हा माणूस एवढा बिलंदर की, मी त्याच्याकडे भेटायला गेलो असता त्याने टेपरेकॉर्डर चालू ठेवला होता, आमचे संभाषण टेप करायला. पण मी सावध होतो आणि मी जातपात अजिबात मानत नाही. त्यामुळे मी जातीवरून बोलण्याचा काही प्रश्नच नव्हता. या माणसाच्या खोडसाळपणाची मला पूर्ण कल्पना होती. भेटीशेवटी मी 'तू टेप केलेले संभाषण बिनधास्त वर्तमानपत्रात छाप' असे सांगून निघालो. अर्थात हा माणूस सरळ आला आणि त्याने बँकेचे पैसे भरले आणि पुन्हा माझ्या वाटेल गेला नाही !

वरीलप्रकारे, माझी तीन वर्षे ग्रामीण भागात कशी गेली हे मला समजलेच नाही आणि अतिशय समाधानपूर्वक माझी बदली होऊन मी परत शहरात आलो.

शब्दांकन : **श्रीकांत शिंत्रे, सौ. ज्योत्स्ना शिंत्रे,**
मोबा. ९९२००५८७०५



**दिनविशेष (सप्टेंबर २०२४)**
**श्रावण - भाद्रपद १९४६**
**शोभननाम - क्रोधीनाम संवत्सरे**


**सौजन्य : श्री महालक्ष्मी दिनदर्शिका**
**श्री महालक्ष्मी दिनदर्शिका जिथे जिथे।**
**साक्षात लक्ष्मी वसे तिथे।**

**रविवार दि. १ :** पर्युषण पर्वारंभ, **सोमवार दि. २ :** पिठोरी अमावास्या, **शुक्रवार दि. ६ :** हरितालिका तृतीया, **शनिवार दि. ७ :** श्री गणेश चतुर्थी, **रविवार दि. ८ :** श्री गजानन महाराज पुण्यतिथी, ऋषी पंचमी, साक्षरता दिन, **मंगळवार दि. १० :** ज्येष्ठा गौरी आवाहन, **बुधवार दि. ११ :** ज्येष्ठा गौरी पूजन, **गुरुवार दि. १२ :** ज्येष्ठा गौरी विसर्जन, घरगुती गणेश विसर्जन, **सोमवार दि. १६ :** ईद-ए-मिलाद, **मंगळवार दि. १७ :** अनंत चतुर्दशी, **बुधवार दि. १८ :** महालयारंभ, **शनिवार दि. २१ :** संकष्ट चतुर्थी (चंद्रो.९.०२), **शुक्रवार दि. २७ :** जागतिक पर्यटन दिन, हादगा (भोंदला).


# मुलांचे पान




## » चित्र रंगवा



## ≫ फरक ओळखा




## ≫ ठिपके जोडून चित्र तयार करा



### शब्दप्रभुत्त्वाची साक्ष असलेल्या 'ज्ञानाच्या सोपानाची' जीवनगाथा

# ज्ञानसूर्याची सावली

### (लेखांक पस्तिसावा)

**१३**

आता पुरतं उजाडलं होतं. त्या भास्कराच्या आगमनानं पृथ्वीतलावरचा अवघा अंधकार दूर झाला होता. सारं भय, साऱ्या आशांका, धूसर दिसणाऱ्या दिशा, सारं-सारं नाहीसं होऊन सगळं-सगळं स्पष्ट झालं होतं. सुलेख झालं होतं. सुनिश्चित झालं होतं. निवृत्तीनाथ आता या दोघांचे गुरू होते. वडीलभावाच्या मायेपेक्षा गुरुत्वाचं कर्तव्य अधिक महत्त्वाचं होतं. उत्कट मायेपोटी येणाऱ्या चिंतेपेक्षा कर्तव्य कठोर गुरुत्वाची कसोटी अधिक मोठी होती. आपण उचललेलं हे शिवधनुष्य आपल्याला पेलेल की नाही, या आशंकेनं निवृत्तीनाथ बेचैन झाले होते. 'गुरु गहिनीनाथांशी याबाबतीत सल्लामसलत केली पाहिजे', त्यांच्या मनात आलं. ते नक्कीच मार्ग दाखवतील. त्यांना विश्वास वाटला आणि त्यांचं मन शांत झालं. वाळवंटातून झपझप पावलं पडू लागली. निवृत्तीदादांच्या चेहऱ्यावरचं द्वंद्व ज्ञानेश्वरानं वाचलं. दादाच्या मनात काय चाललंय, याचा त्याला काहीसा अंदाज आला. क्षणभर त्याला वाटलं दादाला विचारावं; पण त्याचं धाडस झालं नाही. मुकाट पावलं टाकत तो दादाबरोबर चालला; पण सोपान? त्याचं तर इकडे लक्षच नव्हतं. निवृत्तीदादांनी आपल्याला शिष्य करून घेतलं, याचा विलक्षण आनंद त्याच्या चेहऱ्यावरून, त्याच्या देहबोलीतून स्पष्टपणे जाणवत होता. उत्साहानं, आनंदानं तो नुसता सळसळत होता. गंगेच्या वाळवंटात आज त्याची पडणारी पावलं त्या वाळूवर एक खोल ठसा उमटवत होती. जणू निवृत्तीदादाकडून ज्ञानाची दीक्षा घेऊन सोपान चराचरावर आपला असा ठसा उमटवणार होता.

तिघंही झोपडीजवळ आले. डोणीवर पाय धुऊन निवृत्तीदादा आत गेला. ज्ञानेश्वरानंही त्याचंच अनुकरण केलं. आपले तीनही भाऊ आले आहेत म्हणून त्यांना सामोरी आलेल्या मुक्ताशी दोघंही काही बोलले नाहीत; पण डोणीवर पाय धुऊन सोपान वळला आणि समोर मुक्ताला बघून त्याच्या आनंदाला जणू वाचा फुटली. उत्साहाला गती मिळाली आणि मुक्तीचे खांदे धरून तिला गोल-गोल फिरवत सोपान स्वत:ही फिरू लागला. मुक्तीला कळेना हा सोपानदादा आज असं काय करतोय?

''अरेऽअरे ! अरे दादा पडेन ना मी?'' असे ती ओरडायला लागली तेव्हा सोपान भानावर आला. तिला फिरवणं आणि स्वत:चंही फिरणं थांबवून मोठ्या प्रसन्न मुद्रेनं तो मुक्तीकडे बघू लागला. त्याच्या डोळ्यांतून आनंद ओसंडत होता. ओठांतून हसू ओघळत होतं आणि चेहरा तेजानं ओथंबला होता. ''दादा, ए ऽ दादा ! काय झालं? सांग ना !'' मुक्तीनं लडिवाळ आग्रह केला. सोपान जणू याची वाटच बघत होता. ''मुक्ते ऽ मुक्ते ! अगं काय सांगू तुला? अगं आज मला इतका आनंद झालाय, की... मला खूप आनंद झालाय ! अगं मुक्ते, अगं आज निवृत्तीदादानं माझा शिष्य म्हणून स्वीकार केला. आता ज्ञानादादासारखं तो मलाही शिकवेल. आता मलाही ज्ञानानं संपन्न करेल. माझ्याही ज्ञानाला गती येईल. दिशा मिळेल. माझ्या मनाचं अवकाशही ज्ञानाच्या कणांनी भरून जाईल. मुक्तेऽ मुक्ते, मी गेले कित्येक दिवस या क्षणाची वाट बघत होतो, पण आज तो मला लाभला !'' सोपाना भरभरून बोलत होता; गेले कित्येक दिवस उदास राहणारा, अबोल राहणारा आपला हा लाडका भाऊ आनंदानं, उत्साहानं नुसता निथळतोय, हे बघून मुक्तीलाही आनंद झाला. तिनंही त्या आनंदात एक गिरकी घेतली. सोपानाच्या आनंदाची संगत तिलाही लागली आणि इवल्याशा झोपडीच्या त्या इवल्याशा अंगणात जणू आकाशमंडळ अवतरलं.

तो संपूर्ण दिवस तसाच गेला. आनंदानं मोहरलेला. त्या दिवशी रात्री निवृत्तीनं सोपानाला सांगितलं, ''सोपाना, उद्या भल्या पहाटे आमच्या-बरोबर गंगेच्या घाटावर यायचंस. उद्यापासून तुझं अध्ययन सुरू.'' सोपान दिवसभर तर आनंदलेला होताच, पण निवृत्तीदादानं असं सांगताच त्याचे डोळे आणखीच आनंदानं लकाकले. मोठ्या आनंदानं त्यानं होकारार्थी मान हलवली. हळूच मुक्तीकडे पाहिलं. ती त्याच्याकडेच बघत होती. नजरानजर होताच मुक्तीनं, ''आहे बुवा !'' अशी मान डोलावली. सोपानानं भिवया उंचावत 'मग !' अशी खूण केली. त्यांची ही नजरखेळी ज्ञानेश्वराच्या नजरेतून सुटली नाही. 'हं !' असा हुंकार करत त्यानं दोघांना दम भरला. मग मात्र सोपान अंथरुणावर आडवा झाला. डोळे मिटले; पण मिटल्या डोळ्यांसमोर दिसत होता इंद्रायणीचा घाट, तिचं विस्तीर्ण पसरलेलं वाळवंट, लहरणारं तिचं पाणी आणि त्या काठावर बसलेले तिघं जण - निवृत्ती, ज्ञानेश्वर, सोपान. हे असं सगळं बघतच सोपान झोपी गेला. तो गंगेचा घाट डोळ्यांसमोर उलगडत असतानाच आपल्याला झोप कधी लागली, हे त्याचं त्यालाच कळलं नाही. गाढ झोपलेल्या सोपानकडे एकटक बघणाऱ्या निवृत्तीच्या डोळ्यांत मात्र नकळत अश्रूंचे थेंब उभे राहिले. त्याचं कारण त्याला स्वत:लाही कळलं नाही.

सोपानाला पडल्या पडल्या झोप लागली खरी, पण त्याला जाग मात्र अचूक आली. अंथरुणावर उठून बसून त्यानं हात जोडले -

कराग्रे वसते लक्ष्मी
करमध्ये सरस्वती
करमूले तू गोविंदम्
प्रभाते करदर्शनम् ।

म्हणत त्यानं चेहऱ्यावरून हात फिरवला आणि डोळे उघडले. समोर निवृत्तीदादा आणि ज्ञानेश्वर उभे होते. त्यांना समोर बघून सोपानही चटकन उभा राहिला. खाली वाकून त्यानं निवृत्तीच्या पायांवर डोकं टेकवलं. निवृत्तीनं त्याला खांद्याला धरून उभं केलं आणि त्याच्या नजरेत नजर रोखून म्हणाला, ''चला ! निघायचं?'' सोपानानं मूकपणे मान हलवली. निवृत्ती बाहेर पडला. पाठोपाठ ज्ञानेश्वर आणि त्या दोघांच्या पावलांच्या ठशांचा समन्वय साधत त्यावर आपली पावलं टाकत सोपान चालला. विठ्ठलपंत-रुक्मिणीबाईंचा धाकटा पुत्र, निवृत्ती-ज्ञानेशाचा धाकटा भाऊ, मुक्ताईचा सोपानदादा निघाला होता, ज्ञानमार्गाचा राजरस्ता गाठायला. भगवद्गीता, पुराणं, संस्कृत, व्याकरण, श्लोक हे सारं त्याला अवगत होतं. त्याच्या बाबांनी त्याला ते शिकवलं होतं; पण आता त्याचा मोठा भाऊ निवृत्तीदादा, त्याचे गुरू निवृत्तीनाथ त्याला ज्ञानाच्या सागरात पोहायला शिकवणार होते. वेद, उपनिषदं, शास्त्रं, हटयोग, कुंडलिनी, शांकर सूक्त. ज्ञानाचा हा महासागर. त्याचं बोट धरून त्याचे गुरू त्याला घेऊन जाणार होते. निवृत्ती-ज्ञानेशाच्या पाठोपाठ सोपानाची पावलं पडत होती. प्रत्येक पावलागणिक त्याच्या शरीरावर रोमांच उभे राहत होते. प्रत्येक पावलागणिक एक अनिवार ओढ, एक अनामिक हुरहूर जिवाला लागत होती. सोपानानं नकळत नजर उचलून समोर पाहिलं. पूर्व क्षितिज आपले विशाल बाहू पसरून आपल्याला कवेत घेण्यास उत्सुक आहे, असं त्याला वाटलं आणि त्याचा उत्साह शतगुणित झाला.

बघता-बघता गंगेचा घाट मागे पडला. वाळवंटही संपलं. पाण्यावरून येणारा वारा गारठा घेऊन येत होता. तो मात्र जाणवत होता. अजूनही काही खट्याळ चांदण्या आकाशात लुकलुकत होत्या. घाटही बराच मागे पडला आणि झाडी सुरू झाली. खरंतर ते जंगल अजून शांत होतं; पण त्या निरव शांततेत या तिघांचे पायरव वाजायला लागले आणि अवघ्या जंगलाला जणू जाग आली. पाखरांची किलबिल सुरू झाली. त्यांच्या साम्राज्यात हालचालही सुरू झाली. निवृत्ती-ज्ञानेशाला हे सवयीचं असावं. पक्ष्यांच्या किलबिलाटाचं, त्यांच्या पंख फडफडण्याचं त्यांना काही विशेष वाटलं नाही; पण सोपाना? त्याला तर हे सगळंच नवीन होतं. एकतर एवढ्या पहाटे गंगेच्या घाटाच्या पुढे तो कधीच आला नव्हता आणि या जंगलात तर नाहीच नाही. त्यातच ती गर्द झाडी, आपण प्रवेशतानाची

असलेली नीरव; पण गूढ शांतता आणि आपल्या पायरवानं जंगलाला आलेली जाग ! सगळं सगळंच त्याला नवीन होतं. पक्ष्यांचा किलबिलाट तर इतका गोड होता की, ज्ञानेशाच्या मागून, त्याच्या पावलांच्या मुद्रांवर नजर ठेवून त्याला चालवेना. अभावितपणे त्याची नजर झाडांकडे वळू लागली. एखाद्या पक्ष्यांची किलबिल, एखाद्याची शीळ, एखाद्याचा वेगळा आवाज ऐकू आला की, त्याची नजर फांद्या-फांद्यांवरून भिरभिरत राहिली. त्या पक्ष्यांना शोधत राहिली. किती वेळ गेला कुणास ठाऊक? आता ते तिघंही गर्द झाडीत आले होते. निवृत्ती थांबला. ज्ञानेश्वरही थांबला आणि सोपानही थांबला. त्यानं सभोवती नजर फिरवली. त्या झाडीत मधोमध एक अंकणभर रिकामी जागा होती. तिथं तीन दिशेला तीन शिळा होत्या. त्यातल्या एका उंच शिळेवर निवृत्तीदादा जाऊन पद्मासन घालून बसला. दुसऱ्या शिळेवर ज्ञानादादा बसला आणि त्याने सोपानला तिसऱ्या शिळेवर बसण्याची खूण केली. त्या दोघांना वंदन करून सोपाना त्या तिसऱ्या शिळेवर पद्मासन घालून बसला. त्याची नजर निवृत्तीदादाकडे लागली होती. काय नव्हतं त्या नजरेत? उत्सुकता होती; दादा काय-काय सांगतो याची, आतुरता होती; कधी सांगतो याची, अपेक्षा होती; लवकर सांगेल याची, प्रतिक्षा होती; तो सांगेल ते ग्रहण करण्याची, आस होती; नवीन काही शिकण्याची, अधीरता होती; प्रतीक्षा कधी संपते याची, विश्वास होता; निवृत्तीदादाच्या ज्ञानावर, निश्चिती होती; आपल्या उज्ज्वल ज्ञानसंपन्नतेची- एवढ्या सगळ्या भावनांना एकवटून सोपानाची नजर निवृत्तीदादाकडे लागलेली होती.

निवृत्तीनं हात जोडले, दीर्घ श्वास घेतला. डोळे मिटले. एक क्षणभर श्वासावर लक्ष केंद्रित करून त्यानं ओंकार लावला. उजळलेलं पूर्व क्षितिज, वातावरणातली निरव शांतता, दवानं भिजलेल्या पानांचा येणारा मंद सुगंध, त्या शांततेला बारीकसा छेद देणारी पक्ष्यांची गोड किलबिल, झुंझुमुंजणारे आकाश आणि त्या सगळ्यांमध्ये भरून राहिलेला निवृत्तीचा तो ओंकार ! (क्रमश:)

**– सौ. मंजुश्री गोखले,**
मो. ८८०५३५५२००

# छोटा सा काम मां !



दिवसाच्या शेवटच्या ट्रेनने प्लॅटफॉर्म सोडला. उद्या सकाळी पुढची ट्रेन येईल याची कल्पना न करता एक म्हातारी बसली आहे.. एका कुलीच्या ते लक्षात आलं. त्यानं आईला विचारलं. 'माईजी, तू कुठे जात आहेस?'

'मी माझ्या मुलाकडे दिल्लीला जाईन.'

'आज ट्रेन नाही, आजी.'

बाई असहाय्य दिसत होती. कुली दयाळूपणे प्रतिक्षागृहातील महिलेसाठी निवारा देऊ करत होता. तिने होकार दिला. कुलीने तिला तिच्या मुलाबद्दल विचारले.

आईने उत्तर दिले की तिचा मुलगा रेल्वेत काम करतो.

'मला नाव सांगा, बघतो संपर्क शक्य आहे का.' कुली म्हणाला.

'तो माझा लाल आहे, सगळे त्याला लाल बहादूर शास्त्री म्हणतात!' आईने उत्तर दिले.

मुलगा तेव्हा भारतीय रेल्वेचा कॅबिनेट मंत्री होता. क्षणार्धात संपूर्ण स्टेशन गजबजून गेले. थोड्याच वेळात एक मोठी गाडी आली. वृद्ध स्त्रीला आश्चर्य वाटले !

लाल बहादूर शास्त्री यांना काहीच माहीत नव्हते. सर्व व्यवस्था भारतीय रेल्वेने केली होती !

तिच्या मुलाला भेटल्यानंतर तिने मुलाला विचारले - 'बेटा तू रेल मे क्या काम करता है? इलोग पुछा तो मै कुछ नहीं बोल पायी.'

मुलगा म्हणाला - 'छोटा सा काम मां !'

# सोपानदेवांची 'अलौकिक सोपानदेवी'

ज्ञानेश्वरांनी श्रीमद्भगवद्गीतेवरील भाष्य ज्ञानेश्वरीद्वारा लिहून या महान ग्रंथराजाचा सर्वसामान्यांना परिचय करून दिला हे आपण जाणतो. मात्र ज्ञानेश्वरांपाठोपाठ त्यांचे धाकटे बंधू सोपानदेवांनीही अतिशय सोप्या भाषेत गीतेचा ओवीबद्ध अर्थ सांगितला आहे हे किती लोक जाणतात? गीतेच्या ७०० श्लोकांचे निरूपण ज्ञानदेवांनी सुमारे ९०३२ ओव्यांतून केले आहे. तर सोपानदेवांनी ते अवघ्या ७०४ ओव्यांतून आणि नागर मराठी भाषेत केले आहे. नवस्नेहच्या संपादिका सौ. मंजुश्री गोखले यांनी सोपानदेवी संपादित केली असून आपण ती क्रमश: वाचत आहोत. यात ठळक टाईपात सोपानदेवांची रचना असून त्याखाली विनोबांनी केलेली गीताईतील रचना दिली आहे.

**– व्यवस्थापक**

**अध्याय ६ : आत्मसंयमयोग**

**सोई रे बंधु आणि मित्र जाण । वैरी पापी आणि उदासीन । तया अवघीया देखे समान । तो श्रेष्ठ बोलिजे ।।८।।**

तोषला ज्ञान-विज्ञानें स्थिर जिंकूनि इंद्रियें ।
तो योगी सम जो देखे सोनें पाषाण मृत्तिका ।।८।।

**योगी एकांती बैसोनी । असावे आत्मरहस्य ध्यानीं । चित्त आत्मा जिंतोनी । आशा टाकोनी परिग्रही उदास ।।९।।**

शत्रु मित्र उदासीन मध्यस्थ परका सखा ।
असो साधु असो पापी सम पाहे विशेष तो ।।९।।

**पवित्र शुभदेशी प्रतिष्ठोन । स्थिर करावे आपुले आसन । उंच नीच नसावे जाण । बैसावया कुश: कृष्णाजन वस्त्र ।।१०।।**

साधकें चित्त बांधूनि इच्छा संग्रह सोडुनी ।
आत्म्यास नित्य जोडावें एकांती एकलेपणें ।।१०।।

**मग इंद्रिय चित्त नेमुनी । बैसावया तया आसनी । आत्माशुद्ध व्हावया लागुनी । योग करावा ।।११।।**

पवित्र स्थान पाहूनि घालावें स्थिर आसन ।
दर्भ चर्म वरी वस्त्र न घ्यावें उंच नीच तें ।।११।।

**काया सम करूनी कंठी हनुवटी । दृष्टि दिजे नासिका पुटी । स्थिर कीजे श्वासाचिये परिपाटी । दिशावलोकन करावे ।।१२।।**

चित्तेंद्रियांचे व्यापार वारावे तेथ बैसुनी ।
आत्म-शुद्ध्य जोडावा योग एकाग्र मानसें ।।१२।।

**निर्मळ अंत:करण करोनी । निर्भय मनी होऊनी । ब्रह्मचर्य आचरोनी । सर्व भावें मजलागी ।।१३ ।।**

शरीर सम-रेखेंत राखावें स्थिर निश्चळ ।
दृष्ठि ठेवूनि नासाग्रीं न पहावें कुणीकडे ।।१३।।

**चित्त ठेव माझ्या ठायी । मीच निजवस्तु पाही । समाधिनिष्ठ होउनी राही । मज तत्पर अर्जुना ।।१४।।**

शांत निर्भय मच्चित ब्रह्मचर्य-व्रतीं स्थिर ।
मन रोधूनि युक्तीनें रहावें मत्परायण ।।१४।।

**सदा प्राणायाम लक्षी असता । योगी मनासी जिंतीती सर्वथा । मन जिंतिलिया पावे तत्वता । शांति माझ्या ठायी ।।१५।।**

असें आत्म्यास जोडूनि योगी आवरिला मनें ।
मोक्षास भिडली शांति माझ्या ठाईं चि मेळवी ।।१५।।

**वाचकांनी आपले बदललेले पत्ते चित्पावन संघाच्या कार्यालयात किंवा ७६२०५४६२२५ या व्हॉटस् ॲप क्रमांकावर लौकरात लौकर पाठवावेत.**



# हिंदूधर्मरक्षक विचारवंतांची द्विजन्मशताब्दी

जगभर साम्यवादाची विचारधारा नेणारे कार्ल मार्क्स यांनी १८६७ साली दास कॅपिटाल ग्रंथातून हा विचार मांडला. भारतात १८६७ सालीच शोषणमुक्त समाजाची विचारधारा सुखदायक राज्य प्रकरणी निबंध या ग्रंथातून देणारे विष्णुबुवा ब्रह्मचारी मात्र आम्ही दुर्लक्षित केले. समता आणि समाजवादाचे उद्गाते हिंदू धर्मातील कर्मकांड आणि त्याज्य रूढीला विरोध करून धर्माची शाश्वत विचारधारा ग्रंथातून आणि व्याख्यानांमधून मांडणारे पहिले हिंदू मिशनरी विष्णु भिकाजी गोखले या अपरान्त भूमीने समाजाला दिलेले निर्भीड संन्यासी !

१८१८ साली पेशवाईची अखेर झाली. अनेक संस्थानिकांनी निमूटपणे इंग्रजी सत्ता मान्य केली. देशभर इंग्रजांचा अंमल दृढमूल झाला. सत्तेबरोबरच त्यांनी येताना आपला धर्महीं आणला. तसे तर इंग्रज येण्यापूर्वीच पोतुगिजांनी भारताला ख्रिश्चन धर्माची ओळख करून दिली होती. अर्थात ती भयावह होती. ज्या ज्या प्रदेशात पोर्तुगीज गेले तिथे त्यांच्या धर्मगुरुंनी अन्य धर्मियांचा अनन्वित छळ करून धर्मांतर केले होते. पोर्तुगीज हे कॅथॉलिक पंथीय होते. मात्र इंग्रज हे प्रोटेस्टंट पंथ मानणारे असल्याने त्यांचे धर्मांतराचे मार्ग वेगळे होते. ते बुद्धिभेद करून आणि वैचारिक संघर्षकरून धर्मांतरण करण्याचा प्रयत्न करत होते. हिंदू धर्मातील दोष शोधून ते पुन्हा पुन्हा मांडण्याचा आणि आमचा धर्म कसा निर्दोष असून सर्व समावेशक आहे हे व्याख्याने देऊन आणि ग्रंथ प्रसिद्धी करून गावोगावी सांगत होते. हे एका बाजूला सुरू असतानाच शास्त्रापेक्षा रूढी श्रेष्ठ आहे हे सांगत परंपरावादी त्याज्य रूढींना कवटाळून बसले होते. परदेशातून भारतात आल्यानंतर या धर्मप्रसारकांनी इथल्या संस्कृतीचा अभ्यास करतानाच भारतीय भाषांमध्येही प्रावीण्य प्राप्त केले होते. रेव्हरंड जॉन विल्सन उत्तम प्रकारे मराठी बोलत असे. मराठी भाषेत वादविवाद करण्याची क्षमता असणाऱ्यांमध्ये कृष्णशास्त्री चिपळूणकर, मोरभट दांडेकर यांच्याइतकेच जॉन विल्सनचेही योगदान आहे. इंग्रज राज्यकर्ते असल्याने त्याकाळी निर्माण होणाऱ्या पाठ्यपुस्तकात ख्रिस्ती धर्माची माहिती देण्याचा प्रकारही सुरू होता. याला दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर, नाना शंकरशेट यांचा विरोध होता. मोरभट दांडेकरांनी १८४४ साली उपदेश चंद्रिका नावाचे मासिक सुरू केले. लोकांना आपल्या धर्माची शाश्वत मूल्ये कळवित आणि ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या प्रचाराला त्यांनी बळी पडू नये यासाठी हे मासिक सुरू केले होत.

संत तुकारामांनी म्हटलय, ‘धर्माचे पालन करणे पाखंड खंडन’ तुकारामांप्रमाणेच पाखंड खंडन करणारे विष्णुबुवा ब्रह्मचारी ! हा अवलिया जन्मला रायगड जिल्हा माणगाव तालुक्यातील शिरवली या गावी. २० जुलै १८२४ रोजी यांचा जन्म झाला. मूळ नाव विष्णु भिकाजी गोखले. घरची गरिबी असल्याने फारसे शालेय शिक्षण झाले नाही. नवव्या वर्षीच उदरनिर्वाहासाठी नोकरीच्या शोधात बाहेर पडले. महाडला एका किराणा मालाच्या दुकानी गडी म्हणून नोकरी केली. पुढे सीमा शुल्क विभागात नोकरीला लागले. वसई, विरार, कल्याण, उरण इ. ठिकाणी नोकरी केली. पुढे पुढे धार्मिक विषयांची आवड वाढत गेली. धर्मग्रंथांचा अभ्यास सुरू झाला आणि वयाच्या तेराव्या वर्षी ते सप्तशृंगी डोंगरावर साधनेसाठी गेले. तिथे त्यांना साक्षात्कार झाला. धर्माचे शाश्वत स्वरूप समाजासमोर आणून रूढी आणि आचाराचे वाढलेले स्तोम नाहीसे करण्यासाठी आपल्याला ईश्वराचा आदेश आहे असा विश्वास निर्माण झाला.

सप्तशृंगीवरून ते पंढरपूरला आले. तिथे रामायण

पारायण केले आणि भावार्थसिंधू नावाचा ओवीबद्ध ग्रंथ लिहिला. तिथून सांगली, मिरज, सातारा, वाई, पुणे, अहमदनगर इ. ठिकाणी व्याख्याने दिली. तिथून मुंबईला आले. मुंबईत त्यावेळी रेव्ह. जॉन विल्सन सारखे अनेक ख्रिश्चन धर्मगुरू ख्रिस्ती धर्माचा प्रचार करत होते. विष्णुबुवांची ख्रिश्चन धर्माशी ओळख झाली. इंग्रजांनी देशाची राज्यसत्ता ताब्यात घेतलीच आहे आता इथल्या संस्कृतीवरही त्यांचे आक्रमण सुरू आहे. हे विष्णुबुवांच्या ध्यानात आले. या आक्रमणाचा प्रतिकार करायला हवा या निश्चयाने त्यांनी कडाडून विरोध करून वैदिक धर्माचे शाावत स्वरूप समाजाला समजावे म्हणून वेदोक्त धर्मप्रकाश हा ग्रंथ लिहिला. इतकेच करून न थांबता त्यांनी मुंबईतील प्रभू समाजाच्या विद्यालयात ख्रिस्ती धर्मगुरूंच्या प्रचाराला उत्तरे देणारी व्याख्याने सुरू केली. या व्याख्यानाला त्यानी १ आणा प्रवेश शुल्क ठेवले होते. तरीही प्रचंड गर्दी होऊ लागली; कित्येकवेळा पोलीस बंदोबस्त करावा लागायचा. मात्र विष्णुबुवांच्या ध्यानात आले हे ख्रिश्चन मिशनरी विशेष करून अस्पृश्य समाजाला गोड बोलून आपल्या जाळ्यात ओढतात. आपली व्याख्याने विद्यालयाच्या परिसरात होत असल्याने इथे अस्पृश्यांना आणि ज्या मिशनऱ्यांच्या प्रचाराला आपण उत्तरे देतो त्यांना इथे प्रवेश नाही. विष्णुबुवांनी आता बाहेर समुद्र किनाऱ्यावर व्याख्याने द्यायला सुरुवात केली. इथे सर्वांना मुक्तद्वार होते, रेव्ह जॉन विल्सनही येत असे. ख्रिश्चन मिशनरी विरूद्ध विष्णुबुवा असे वादविवाद या किनाऱ्यावर झडले ! नगरच्या अमेरिकन मिशनमध्ये धर्मप्रचारक म्हणून आलेल्या रेव्ह. जॉर्ज बोबेन याने या झालेल्या वादसंवादावर समुद्र किनाऱ्यावरचा वादविवाद हे पुस्तक १८९० साली प्रकाशित केले. विष्णुबुवांनी जसा ख्रिस्ती मिशनऱ्यांशी प्रतिवाद केला. तसाच कर्मकांडवाद्यांशीही संघर्ष केला. त्यांना जातीभेद अमान्य होता. सामाजाची प्रगती हवी असेल तर स्त्रियांना शिक्षण देणे आवश्यक आहे. सतीची प्रथा ही धर्ममान्य नाही. त्यामुळे ही अमानुष प्रथा बंद व्हायला हवी. स्त्रीला वैधव्य आले तर तिला पुनर्विवाह करता आला पाहिजे. तीस वर्षांच्या पेक्षा जास्त वय असलेल्या पुरुषाने विधवेशी विवाह करावा. जात ही जन्मापेक्षा कर्मानुसार असावी, कारण वेदकाळात जन्मदत्त जातीभेद नव्हते. विष्णुबुवांनी सुखदायक राज्यप्रकरणी निबंध ग्रंथात अनेक नवे विचार समाजाला दिले. त्यांना जन्मजात श्रेष्ठत्व जसे मान्य नव्हते, तसेच कुठल्याही राजघराण्याची परंपरागत सत्ताही मान्य नव्हती. ते म्हणतात, राजा जर म्हातारा झाला तर प्रधानमंडळाने एकत्रित विचार करून नव्या योग्य राजाची निवड करावी. न्यायालयीन कामकाजातही उच्चनीचता असू नये. अन्यायी ब्राह्मण आणि अन्यायी महार यांचा न्यायनिवाडा सारखाच व्हावा. न्यायालयात दोघांनाही समोर उभे करून न्याय द्यावा. महार म्हणून त्याला बाहेर उभे करू नये. राजाने स्वत:ला श्रेष्ठ न समजता मीही एक कामगारच आहे असे मानावे. सुखदायक राज्य प्रकरणी निबंध म्हणजे विष्णुबुवांचा आदर्श राज्यकारभाराचा जाहीरनामाच आहे. बंडखोर विष्णुबुवा जरूर धर्माभिमानी होते, मात्र झापडबंद नव्हते. पूर्वी पोर्तुगीज मिशनरी विहिरीत पाव टाकत. ते पाणी प्यायले ते सारे ख्रिश्चन झाले. इतकी सोपी धर्मांतर व्यवस्था त्यांनी केली होती. विष्णुबुवा सर्वांच्या समोर पाव खात असत. खानपानातून धर्मभ्रष्ट होतो ही कल्पना वेडगळ आहे हे सिद्ध करण्यासाठी त्यांनी मुसलमान आचारी ठेवला होता. धर्मजागृतीची त्यांची तळमळ अंत:करणातून उमटलेली होती. विचार प्रसारार्थ त्यांनी मद्रास, काशी, कलकत्ता या शहरातही व्याख्यानासाठी प्रवास केला होता. सर जमशेटजी जिजिभाय यांच्यासारखे अनेक विद्वान त्यांना सन्मान देत. १८ फेब्रुवारी १८७१ काळपुळीच्या विकाराने त्यांचे निधन झाले.

आपल्या प्रखर वाणीद्वारे परकीय धर्मगुरूंशी संघर्ष करणाऱ्या विष्णुबुवांची २० जुलैला द्विजन्मशताब्दी सुरू झाली आहे. त्यांना साष्टांग नमस्कार!

**– प्रकाश देशपांडे,**

मोबा. ९४२३८३१६६८

**सोने-चांदी मौल्यवान खरेदी !**

# गोखले ब्रदर्स

**सराफी दुकान**

**गुरुवार, दि. 26 गुरुपुष्यामृत**

**आपलं दुकान**

**महाद्वार रोडवर, 0231-2546585**

# समतोल कृष्ण !

मला जर कोणी विचारलं की कृष्ण म्हणजे काय हे एका शब्दात सांग तर मी त्याचं उत्तर समतोल असं देईन. आयुष्यात समतोल कसा साधावा हे कृष्ण शिकवतो. मग तो यमुनेचा काठ असू दे वा कुरूक्षेत्राचं रण, रासलीला असू दे वा युद्धकला, राधेची प्रीती असू दे वा मीरेची भक्ती, जन्मदात्री देवकी असू दे वा पालनकर्ती यशोदा, कृष्ण आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर समतोल साधतो.

आपण जर कृष्णाचे आयुष्य पाहिले तर तो विष्णूचा आठवा अवतार, त्याची जन्मतिथी अष्टमी, जन्मवेळ मध्यरात्री १२ वाजता, देवकी आणि वसुदेवाचे आठवे अपत्य, कृष्णाच्या लग्नाच्या बायका ८, ज्या बायकांना सोडवून तो त्यांचा पती अर्थात पालक झाला त्यांची संख्या १६,०००, श्रीकृष्णाने सांगितलेल्या भगवद्गीतेचे अध्याय १८, गीतेतले एकूण श्लोक ७००. हे सगळे आकडे जर नीट पाहिले तर या सम संख्या आहेत. इतकच कशाला श्रीकृष्णाचा रंग पाहिला तरी त्यात समतोल आढळतो. ना तो काळा आहे ना गोरा आहे. तो सूर्यासारखा तेजस्वीही आहे आणि चंद्रासारखा शीतलही. तो अग्नीसारखा दाहकही आहे आणि पाण्यासारखा प्रवाहीसुद्धा. तो विरक्तही आहे आणि आसक्तही. जेवढा नटखट, चंचल आहे, तेवढाच स्थितप्रज्ञही, तो नियम मोडणारा आहे, पण नितिमत्ता पाळणारा. तो धर्माने चालणाऱ्याला मार्गही दाखवतो आणि अधर्माने वागणाऱ्याला शासनही करतो.

कालानुरूप त्याच्या भूमिका बदलतात. परिस्थितीनुसार निर्णय बदलतात. पण असे असतानाही प्रत्येक भूमिकेत, प्रत्येक निर्णयात ठसठशीत दिसतो तो समतोल. मग लोक आपल्याबद्दल काय म्हणतील, काय लिहितील याची त्याला पर्वा नसते. कारण कृती करण्याआधी त्याने पूर्ण विचार केलेला असतो. तो अर्जुनाला रणसंग्रामासाठी प्रोत्साहन देतो, पण प्रसंगी स्वतः मात्र रणछोडदासही होतो. बालपणी गोपिकांचे कपडे लपवणारा कान्हा, मयसभेत पांचालीचा तारणहार होतो. क्षणार्धात अनेक दैत्यांचा संहार करणारा तो, शिशुपालाचे मात्र १०० अपराध पूर्ण होण्याची वाट बघतो. तो रुक्मिणीला जवळ करतो, पण सत्यभामेला अंतर देत नाही.

तो मुरलीधर ज्या मुखातून बासरीचे सुर छेडतो, त्यातूनच युद्धाचा शंखनादही करतो. लहानपणी जे हात नवनीताने लडबडलेले असतात, तेच हात रणांगणात पार्थाच्या रथाचे दोरही सावरतात. त्याचे मोरपंख हाताळणे जेवढे नाजूक असते, चक्र चालवणे तेवढेच घातक. तो अर्जुनालाही उपदेश करतो आणि दुर्योधनालाही. कौरवांनाही समज देतो आणि पांडवांनाही. जिथे शब्दाचा मार पुरेसा असतो तिथे तो गीतेचा उपदेश करतो, जिथे शब्द अपुरे पडतात तिथे तो शांतीदूत असूनही विराट रूप दाखवतो. आलिशान महालातले पंचपक्वान्न ग्रहण करणारा तो द्वारकाधीश, सुदाम्याचे पोहे पण तेवढ्याच प्रेमाने खातो. जेवढ्या भक्तीभावाने तो भजन-कीर्तनातून आठवला जातो, तितक्याच श्रद्धेने गण, गवळण आणि तमाशातून गायला जातो.

माझ्या मते आज कृष्णाकडून हा समतोल शिकण्याची सर्वाधिक गरज आहे. कारण आज आपल्या आयुष्यातून हा समतोलच हरवत चालला आहे. आचार, विचार, आहार, भावना, राहणीमान, भूमिका या प्रत्येक बाबतीत तो हरवतोय. विद्यार्थीदशेत असताना शालेय अभ्यास-Extra curricular activities ते आजच्या काळात फार सातत्याने वापरली जाणारी संज्ञा Work-Life Balance अशा प्रत्येक बाबतीत समतोल साधता येणे गरजेचे आहे. इतकच कशाला अगदी समाजमाध्यमांवरचा वावर आणि खरे आयुष्य यात समतोल साधणे आज अत्यावश्यक आहे. हा समतोल ज्याला साधता येतो तो तरतो. अर्थात तारून नेणारा तो योगेश्वरच असतो. त्याने दाखवलेल्या 'गीता' नावाच्या मार्गावरून प्रवास सुरू झाला की आयुष्यात समतोल साधण्याची कला आपोआप अवगत होते. मग संकटांचा, दुःखांचा, आव्हानांचा कितीही मोठा 'गोवर्धन' कोसळला तरी तो एका करंगळीवर पेलता येतो !

**– पत्रकार विकास शहा,** शिराळा.



# मुस्लिम स्त्री कलाकार मधुबाला

१४ फेब्रुवारी १९३३ या दिवशी एक आक्रीत घडले. हिंदी चित्रपटसृष्टीला एक अलौकिक आणि देदीप्यमान असे रत्न प्राप्त झाले. तिच्या आरसपानी, मुग्ध, अलौकिक अशा सौंदर्याने साऱ्या हिंदी चित्रपट सृष्टीला वेड लावले.

लाखो लोक तिचे चाहते झाले. लाखो लोकांची हृदये तिने घायाळ केली. तिचा सिनेमा लागला रे लागला की तरुणांपासून म्हाताऱ्यांपर्यंत सर्वजण तुरुतुरु धावत चित्रपट गृहाकडे जायचे आणि कितीही मोठी रांग असली तरी त्या रांगेत उभे राहून ताटकळत सिनेमाचं तिकीट काढायचे. अशी ही स्वर्गातून पृथ्वीवर आलेली तारका म्हणजे मुमताज जेहान बेगम देहलवी  म्हणजेच मधुबाला !

१४ फेब्रुवारी १९३३ या दिवशी मधुबालाचा दिल्ली येथे जन्म झाला. मधुबालाला  एकूण ती धरून ११ भावंडे होती. ती आठ वर्षाची असतानाच तिचे वडील साऱ्या कुटुंबाला घेऊन मुंबईला आले. मुंबई येथे आल्यावर ती बालकलाकार म्हणून सिनेमात काम करायला लागली.

फक्त ३६ वर्षाचे तुटपुंजे आयुष्य असताना तिने त्यापैकी वीस वर्ष हिंदी चित्रपटसृष्टीवर सत्ता गाजवली. या वीस वर्षात तिने एकंदर ६० चित्रपटात काम केले.

बालकलाकार म्हणून काम करत असतानाच १९४७ साली नीलकमल या चित्रपटात तिला मुख्य भूमिका मिळाली. या चित्रपटामध्ये हिरो म्हणून राज कपूर होता आणि याच सिनेमापासून तिला कलाटणी मिळाली. १९४१ साली आपल्या कुटुंबाबरोबर मधुबाला जेव्हा मुंबईला आली तेव्हा ती सर्व मालाड येथील एका गायीच्या गोठ्यात राहत होती. कारण तेव्हा त्यांच्याकडे पुरेसे पैसे नव्हते. नंतर ती बालकलाकार म्हणून चमकली परंतु तिचे कॉन्ट्रॅक्ट फिसकटले व ती परत दिल्लीला गेली.

त्यानंतर बॉम्बे टॉकीजच्या देविका राणी यांनी मधुबालाला मुंबईला बोलावून घेतले. कारण देविका राणी तिला ज्वार भाटा या सिनेमात काम देणार होत्या. परंतु मधुबालाला तो रोल मिळाला नाही. ती परत मालाड येथील गोठ्यातच राहायला लागली. पण आता तिच्या वडिलांनी मुंबईतच राहण्याचा निर्णय घेतला.

मुंबईतील निरनिराळ्या स्टुडिओत मधुबाला हेलपाटे घालायला लागली. शेवटी रणजीत मूवी टोन च्या चंदुलाल शहा यांनी मधुबाला बरोबर तीन वर्षाचे कॉन्ट्रॅक्ट केले आणि तिला पगार होता ३०० रुपये महिना.

तीनशे रुपये पगार मिळायला लागल्यामुळे मधुबाला आणि तिचे कुटुंब एका भाड्याच्या घरात राहायला लागले. १९४४ साली झालेल्या गोदीच्या स्फोटामध्ये त्यांचे ते घर उध्वस्त झाले. मधुबाला आपल्या कुटुंबाबरोबर बाहेर थिएटरमध्ये गेलेली असल्यामुळे ती सर्वजण वाचली.

हिंदीत मधुबालाला पहिलं यश 'लाल दुपट्टा' या सिनेमामुळे मिळालं. त्या सिनेमात तिच्या

अभिनयाचा कस लागला. त्यानंतर तिला चित्रपट मिळत गेले.

रणजीत मूवी टोनच्या सिनेमांमध्ये म्हणजे मुमताज महल (१९४४) धनना भगत (१९४५) राजपुतानी (१९४६) फुलवारी (१९४६) आणि पुजारी (१९४६) या सिनेमात तिने कामे केली. त्यावेळी ती बेबी मुमताज या नावाने प्रसिद्ध होती.

१९४५ मधे फुलवारीचं शूटिंग सुरू असताना मधुबालाला रक्ताची उलटी झाली आणि त्याचवेळी तिच्या खऱ्या आजाराचे स्वरूप समजले आणि तो आजार म्हणजे तिच्या हृदयाला जन्मतःच भोक होते. परंतु आतापर्यंत ते समजलेले नव्हते. ही उलटी झाल्यापासूनच तिला पुढच्या आजाराची कल्पना आली.

यानंतर काही काळ तिला अपयश आले. तो काळ तिच्या कसोटीचा होता. मधुबालाने कमी पैशात काम करायला सुरुवात केली आणि आर्थिक स्थैर्य लाभावे म्हणून तिने एका पाठोपाठ एक अशा २४ चित्रपटांसाठी साईन केले.

'नीलकमल' या चित्रपटातील तिच्या कामाने प्रभावित होऊन देविका राणी यांनी तिला 'मधुबाला' हे नाव सुचवले आणि तेच पुढे प्रसिद्ध झाले. १९४९ मध्ये एक हॉरर फिल्म आली. त्या चित्रपटाचे नाव होते 'महल' आणि तो सिनेमा कमाल अमरोही यांनी दिग्दर्शित केला होता. या सिनेमामध्ये हीरोइन म्हणून सुरैयासकट आणखी काही अभिनेत्रींचे नाव विचारात घेतले जात होते. परंतु कमाल अमरोही यांनी मधुबालाच्या नावाचा हट्ट धरला आणि तिला ते काम मिळाले.

महल या सिनेमाच्या निर्मितीवर जास्त खर्च केलेला नव्हता. कारण तो सिनेमा चालेल याची शाश्वती वाटत नव्हती. परंतु तो जेव्हा रिलीज झाला तेव्हा तो सिनेमा खूप चालला आणि त्या वर्षाची मोठी कमाई करणारा सिनेमा ठरला. मधुबाला हिच्या समोर हिरो म्हणून अशोककुमार होता. नंतर अशोक कुमारबरोबर तिने आणखीही चित्रपट केले. पण महल हा तिचा अशोककुमार बरोबरचा पहिला सिनेमा.

महलच्या पाठोपाठ मधुबालाचे 'दुलारी', 'बेकसुर', 'हसते आसू' असे एका पाठोपाठ एक चित्रपट यायला सुरुवात झाली. 'बादल' ह्या १९५१ साली आलेल्या चित्रपटात मधुबालाने प्रेमनाथ बरोबर काम केले. त्यानंतर त्याच वर्षी 'सैयान' हा चित्रपट आला. त्यात तिच्याबरोबर हिरो म्हणून अजित होता.

१९५१ साली मधुबालाची दिलीपकुमार बरोबर जोडी जमली. त्यावर्षीचा दिलीपकुमारबरोबर 'तराना' हा सिनेमा आला आणि त्या पाठोपाठ १९५२ साली 'संग दिल' हा सिनेमा आला. मधुबालाचे दिलीपकुमारबरोबर सूर जुळायला लागले. आपल्याला जोडीदार मिळाला असे तिला वाटायला लागले. परंतु नंतर त्या दोघांना प्रेमामध्ये सफलता मिळाली नाही.

१९५३ साली मधुबालाने स्वतःची चित्रपट निर्मिती सुरू केली. त्या कंपनीचे नाव होते मधुबाला प्रायव्हेट लिमिटेड. परंतु त्याच्यानंतर म्हणजे १९५४ साली मद्रास येथे 'बहुत दिन हुए' या सिनेमाचे शूटिंग करत असताना तिची प्रकृती एकदम ढासळली. शूटिंग संपवून ती ताबडतोब मुंबईला आली आणि नंतर तिने थोडे दिवस रजा घेतली.

१९५४ साली मधुबालाने 'अमर' या चित्रपटात काम केले. त्यात तिच्यासमोर हिरो होता दिलीपकुमार व दुसरी हिरोईन होती निम्मी.

काही दिवसांच्या रजेनंतर १९५५ साली मधुबालाचा 'मिस्टर अँड मिसेस ५५' हा सिनेमा आला. त्यात तिचा हिरो होता गुरुदत्त. हा सिनेमा प्रचंड चालला आणि त्यावर्षीचा सगळ्यात जास्त उत्पन्न देणारा सिनेमा ठरला.

१९५६ साली 'नया दौर' या चित्रपटाचे शूटिंग सुरू झाले. त्याचे दिग्दर्शक होते बी. आर. चोप्रा. परंतु त्यावेळी मधुबाला व बी.आर.चोप्रा यांच्यामध्ये काही कारणावरून वादविवाद झाला व बी.आर. चोप्रा यांनी मधुबाला ऐवजी वैजयंतीमाला हिला नया दौर मध्ये घेतले. नंतर बी.आर.चोपडा यांनी मधुबालावर तीस हजार रुपयाची नुकसान भरपाईची

केस घातली. नया दौर जेव्हा रिलीज झाला तेव्हा बी.आर. चोप्रा यानी ती केस काढून घेतली.

१९५६ व १९५७ या दोन वर्षात मधुबालाने चित्रपटात काम करण्याचे बरेच कमी केले. त्याला कारण होते तिची तब्येत आणि तिच्यावर सुरू असलेली कोर्ट केस.

१९५८ साली मधुबालाचे दोन चित्रपट आले. पहिला चित्रपट होता 'काला पानी'. यात तिने देवानंदबरोबर काम केले आहे आणि दुसरा चित्रपट होता 'हावडा ब्रिज'. यात तिने अशोककुमारबरोबर काम केले आहे. 'हावडा ब्रिज' हा शक्ती सामंता यांचा सिनेमा होता व सामंतांबरोबरचा मधुबालाचा हा पहिलाच सिनेमा होता. 'काला पानी' व 'हावडा ब्रिज' हे दोन्ही चित्रपट तुफान चालले आणि त्यानंतर आला सुपरहिट सिनेमा 'चलती का नाम गाडी'. यात मधुबालाने किशोरकुमारबरोबर काम केले. याच सिनेमात किशोरकुमारचे दोघे भाऊ अनुपकुमार व अशोककुमार हेही होते. 'चलती का नाम गाडी' हा एक विनोदी सिनेमा होता आणि तो १९५० च्या दशकातला सर्वात जास्त उत्पन्न देणारा सिनेमा ठरला.

यानंतर १९६० साली मधुबालाचा सुपरहिट सिनेमा मुघल-ए-आजम आला. यात तिचा हिरो होता दिलीपकुमार. या सिनेमाने सगळी रेकॉर्ड्स तोडून टाकली. या सिनेमातील मधुबालाचा अभिनय लाजवाब होता. मुघल-ए-आझम या सिनेमाबद्दल लिहावं तेवढं थोडंच आहे. या सिनेमाच्या शूटिंगच्या हकीगतीच कित्येक पानं भरतील एवढ्या होतील. या सिनेमाचे शूटिंग दहा-बारा वर्ष चालले होते. यातील 'जब प्यार किया तो डरना क्या' या एकाच गाण्याचे शूटिंग सुमारे दोन वर्ष सुरू होते. या गाण्याच्या वेळी भव्य सेट्स उभारण्यात आले होते. पृथ्वीराज कपूर हा मुघल सम्राट असतो. त्याच्यापुढे नृत्य करत असताना मधुबाला आपल्या हालचालीने असे दाखवून देते की तू जरी सम्राट पदावर असलास तरी तुझ्या या पदापेक्षा माझं प्रेम जास्त महत्त्वाचे व मौल्यवान आहे.

मुघल-ए-आजम या सिनेमाच्या शूटिंग दरम्यान मधुबालाने नैसर्गिक अभिनय करता यावा म्हणून काही काही वेळा उपाशी राहणे पसंत केले. परंतु यामुळेच तिची प्रकृती बिघडली होती.

मुघल-ए-आजम हा सिनेमा १९६० साली मराठा मंदिर या सिनेमागृहात प्रदर्शित झाला. त्या सिनेमाच्या पहिल्या शोसाठी अनेक दिग्गज कलाकार आलेले होते. मराठा मंदिर हे सिनेमागृह एखाद्या नववधू सारखे सजवलेले होते.

मुघल-ए-आझम पाठोपाठ 'बरसात की रात' हा मधुबालाचा सिनेमा संगीताच्या दृष्टीने अत्यंत यशस्वी असा ठरला. 'मुघल-ए-आजम' आणि 'बरसात की रात' या दोन चित्रपटांमुळे मधुबाला ही सर्वोत्कृष्ट अभिनेत्री ठरली. १९६० च्या नंतर तिला अनेक चित्रपटांच्या ऑफर्स आल्या होत्या. पण प्रकृतीच्या कारणामुळे तिला ते चित्रपट नाकारावे लागले. कारण तिचा हृदयरोग बळावत चालला होता. काही काही वेळा शूटिंग करत असताना ती बेशुद्ध पडत असे. म्हणून ती हलकेफुलके चित्रपट करायला लागली. 'झुमरू', 'नॉटी बॉय' व 'हाफ तिकीट' असे हलकेफुलके चित्रपट तिने केले. किशोर कुमारबरोबर तिची जोडी चांगली जमायला लागली. नंतर त्या दोघांनी लग्नही केले.

१९४० च्या दशकाच्या शेवटी शेवटी मधुबालाने मुंबईतील पेडर रोड येथे एक बंगला भाड्याने घेतला. त्या बंगल्यामध्ये मरेपर्यंत तिचे वास्तव्य होते. तिने ब्यूक, शोवरलेट, स्टेशन वॅगन, हिलमॅन आणि टाऊन अँड कंट्री अशा गाड्या घेतल्या. 'टाऊन अँड कंट्री' ही गाडी त्यावेळी फक्त दोघाजणांकडेच होती. त्यातील एक म्हणजे ग्वाल्हेरचे महाराजा व दुसरी म्हणजे मधुबाला.

अशी ही गुणी, सौंदर्यवान व अभिनय संपन्न अशी मधुबाला १९६४ नंतर हृदयरोगाने त्रस्त झाली. तिला वारंवार डॉक्टरांची ट्रीटमेंट घ्यावी लागत असे. शूटिंगदरम्यान तिच्याऐवजी काही वेळा डमी अभिनेत्री वापरण्यात आली. चित्रपट स्वीकारणे तिने जवळजवळ बंदच केले. परंतु मधुबाला या नावाभोवती प्रसिद्धीचे प्रचंड वलय होते. सारी

चित्रपटसृष्टी तिचा उदो उदो करत होती.

१९६० साली किशोरकुमार व मधुबाला यांचे कोर्ट मॅरेज झाले. चलती का नाम गाडी या सिनेमा पासूनच त्या दोघांचे सूर जुळले होते. मधुबालाला हृदयाचा आजार आहे हे माहीत असून सुद्धा किशोर कुमारने तिच्याशी लग्न केले. कारण मधुबालाचे सौंदर्य हे इतर कोणत्याही गोष्टीपेक्षा सरस होते .

मधुबाला ही शेवटची सुमारे नऊ वर्षे अंथरुणाला खिळून होती असे म्हणायला हरकत नाही व २३ फेब्रुवारी १९६९ या दिवशी या गुणी, सौंदर्यवान, अभिनय संपन्न अभिनेत्रीचे निधन झाले. त्यावेळी अख्खी चित्रपटसृष्टी हळूहळून गेली. परंतु देवापुढे कोणाचा इलाज नव्हता. नियतीने या गुणी अभिनेत्रीला अखेर आपल्या कब्जात घेतले.

मधुबाला या अभिनेत्रीला 'क्वीन ऑफ चॅरिटी' असेही म्हटले जाते. कारण तिने हजारो लोकांना पैशांची मदत केली. आपल्या स्टुडिओमधील स्टाफला ती भरभरून पैसे देत असे .

**– प्रकाश गणेश गानू,**

मोबा. ९४२१९२९८४७

# मेटा एआय हे नेमके काय आहे?

गेल्या काही दिवसांपासून व्हाटसअ‍ॅपच्या युजर इंटरफेसमध्ये एक नवीन अनाहूत पाहुणा पाहिला असेल. बहुतेक लोकांना निळ्या जांभळ्या रंगाची ती रिंग म्हणजे कुठलं तरी नकळतपणे इनस्टॉल झालेले अ‍ॅप वाटले.

काही जणांनी तर ते अनइन्स्टॉल करण्याचाही प्रयत्न केला असेल. परंतु ते अजिबात अनइनस्टॉल होणार नाही. कारण हे कोणतेही नवीन अ‍ॅप नसून मेटा एआय नामक व्हाटसअ‍ॅपचेच सर्वात लेटेस्ट फीचर आहे.

मेटा किंवा फेसबुकने परवाच भारतातील फेसबुक, व्हाटसअ‍ॅप आणि इन्स्टाग्राम युजर्ससाठी मेटा एआय लाँच केले आहे. ज्यांना अजुनही मेटा एआय दिसत नसेल त्यांनी आपली अ‍ॅप्स लेटेस्ट व्हर्जनवर इनस्टॉल करणे आवश्यक असेल.

तर मेटा एआय हा नेमका काय प्रकार आहे? ज्यांना चॅटजीपीटी किंवा गुगल जेमिनी ठाउक आहे त्यांना जनरेटीव एआय असिस्टंट माहित असेल.

मेटा एआय हा तसाच जनरेटीव्ह रिस्पॉन्स असून तो युजर्सना फेसबुक, व्हाटसअ‍ॅप किंवा इन्स्टाग्राम वापरत असताना अ‍ॅपमधून बाहेर न जाताच हवी ती माहिती पाहिजे त्या स्वरुपात मिळवणे, प्लॅनिंग, सल्ला, सजेशन, शिफारशी, काल्पनिक इमेजिस तयार करणे आदी असंख्य कामे काही सेकंदात पूर्ण करतो.

मेटा एआय साठी नवीनतम लियामा ३ टेक्नॉलॉजीचा वापर करण्यात आलाय. व्हाटसअ‍ॅपवर मेटा एआय वापरायचे असेल तर त्या निळ्या जांभळ्या रिंगवर टॅप केल्यानंतर एका नवीन चॅट बॉक्समध्ये डायव्हर्ट केले जाते आणि त्याच ठिकाणी आपला माहितीपूर्ण संवाद सुरू होतो.

त्यामुळे आता कोणतीही माहिती मिळवण्या-साठी गुगल सर्च करण्याची आवश्यकता भासणार नाही. मेटा एआयचे सर्वात लोकप्रिय ठरू शकणारे फीचर म्हणजे इमॅजिन. ज्याचा वापर करून युजर ए आय जनरेटेड प्रतिमा तयार करून त्या इतर व्हाटसअ‍ॅप युजर्सशी शेअरही करू शकेल.

या फीचरमुळे मेटा एआयचे चॅटजीपीटी आणि गुगल जेमिनीपुढे खूप आव्हान उभे राहू शकते, ज्यांचे इमेज जनरेशन अजूनही प्राथमिक अवस्थेत आहे. याचा वापर करण्यासाठी मेटा एआयच्या चॅट बॉक्समध्ये फक्त इमॅजिन हा शब्द टाईप किंवा उच्चारुन इमेज प्रॉम्प्ट द्यावे लागतील.

अर्थात सध्या तरी भारतात मेटा एआय फक्त इंग्लिश भाषेत उपलब्ध असून लवकरच ते चॅट जीपीटी आणि गुगल जेमिनीप्रमाणे भारतीय भाषांमध्येही वापरता येईल.

व्हिडिओ कॉलनंतर मेटा एआय हे फीचर व्हाटसअ‍ॅपच्या इव्होल्यूशनमधील एक माईलस्टोन असून ते युजर्ससाठी अमर्याद शक्यता घेऊन आले आहे. आभासी प्रगतीची नवनवीन क्षितिजं दृष्टिपथात येत आहेत. प्रगतीचा वारू चौफेर उधळू पहातोय !

हीरकमहोत्सवी कोल्हापूर चित्पावन संघ आणि 'पंचरत्न' वधूवर सूचक केंद, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने

## दिवाळी निमित्ताने ब्राह्मण वधूवर विशेषांक प्रसिद्ध होणार

## वधू-वर अंकासाठी विजयादशमीपर्यंत नांव नोंदणी करा ! दिवाळीत विवाह जमवा !!

**हीरकमहोत्सवी कोल्हापूर चित्पावन संघ** आणि महाराष्ट्र, कर्नाटक, गुजरात व मध्यप्रदेश या राज्यात अनेक शाखांद्वारे 'लोकप्रिय' असलेले वधूवर व पालकांच्या विश्वासास पात्र ठरलेले **'पंचरत्न' वधूवर सूचक केंद्र, कोल्हापूर** यांच्या संयुक्त विद्यमाने ब्राह्मण वधूवर विशेषांक प्रसिद्ध करणार आहे. हा अंक पुस्तक स्वरुपात **रविवार, दि. 27 ऑक्टोबर 2024** रोजी प्रकाशित करणार आहोत. नवीन रूपात, नवीन आकारात आणि अंदाजे शेकडो स्थळांबरोबरच अत्यंत उपयुक्त माहितीसह प्रसिद्ध होणारा हा अंक मासिक स्वरूपात आहे. उत्कृष्ट छपाई, शेकडो वधूवरांची माहिती, त्यांच्या संपर्क फोन नंबरसहित देणार आहोत. **या अंकामध्ये ब्राह्मण पोट-शाखेतील देशस्थ, कोकणस्थ, कऱ्हाडे, सारस्वत, सीकेपी तसेच प्रथमवर, घटस्फोटित, सापत्य, विधवा, विधूर अशी सर्व प्रकारची स्थळे प्रसिद्ध करणार आहोत.**

**हीरकमहोत्सवी कोल्हापूर चित्पावन संघ व 'पंचरत्न'** यांच्या संयुक्त विद्यमाने प्रकाशित होणाऱ्या या वधू-वर विशेषांकात ज्या ब्राह्मण वधूवरांना आपली माहिती फोटोसह प्रसिद्ध करावयाची आहे, **त्यांनी विजयादशमी शनिवार, दि. 12 ऑक्टोबर 2024 पर्यंत नावनोंदणी करावी. कोल्हापूर चित्पावन संघ, 428 'बी' वॉर्ड, तुळजाभवानी संकुल, गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ, कोल्हापूर 416012, फोन नं. 0231-2546225, 2991673, 7620546225 किंवा 'पंचरत्न'** च्या पाच राज्यांतील कोणत्याही शाखांमधून प्रत्यक्ष संपर्क साधून आजच आपली नोंदणी करावी. **पंचरत्न 0231-2621001/ 9881291863 नाव नोंदणी शुल्क रु. 500 फक्त, अंकाची किंमत रु. 200 राहील.** (कुरिअर चार्जेस वेगळे)

## नवस्नेह दिवाळी अंकासाठी जाहिरातदारांना आवाहन

कोल्हापूर चित्पावन संघाचे अल्पावधीत लोकप्रिय झालेले मासिक 'नवस्नेह' चा यंदाचा दिवाळी अंक विविध क्षेत्रातील मान्यवरांचे लेख, कथा-कविता, मुलाखत, विनोदी किस्से, नवनव्या पाककृती अशा विविध पैलूंनी पानोपानी सजलेला आणि संग्राह्य अंक ऐन दिवाळीत वाचकांच्या भेटीस येत आहे. हा अंक नेहमीप्रमाणे जगभरातील कोणालाही आपल्या संस्थेच्या वेबसाईटवरही पाहता येणार आहे. या अंकात आपल्या उद्योगाची जाहिरात असावी, असे आम्हाला मनापासून वाटते. आपणही जाहिरात देवून सहकार्य कराल अशी खात्री वाटते. आपणांस आम्ही विनंती करत आहोत की, आपण आपल्या संस्थेची/उद्योगाची जाहिरात लवकरात लवकर पाठवून मोलाचे सहकार्य करावे.

**अंकाची तांत्रिक माहिती पुढीलप्रमाणे :-**

| आकार - क्राऊन साईज 7 x 10 | | |
|---|---|---|
| कव्हर पान 2 व 3 रंगीत प्रत्येकी | रु. | 10,000/- |
| रंगीत पूर्ण पान | रु. | 7,000/- |
| रंगीत अर्धे पान | रु. | 5,000/- |
| रंगीत पाव पान | रु. | 3,000/- |
| कृष्णधवल पूर्ण पान | रु. | 2,000/- |
| कृष्णधवल अर्धे पान | रु. | 1,200/- |
| कृष्णधवल पाव पान | रु. | 800/- |
| शुभेच्छा जाहिरात | रु. | 500/- |
| सदिच्छा (एक ओळ) | रु. | 200/- |

### श्री महालक्ष्मी अष्टमी जागर सोहळ्याच्या महाप्रसादासाठी येणारा अपेक्षित अंदाजे खर्च (रुपयांत)

| | | | |
|---|---|---|---|
| तांदूळ व डाळ | 12,000 | चहा, कॉफी, मसाला | 2,000 |
| रवा व कणिक | 6,000 | भाजीपाला | 10,000 |
| साखर | 6,000 | बटाटे, फळे | 5,000 |
| बेसन पीठ | 4,000 | नारळ | 2,000 |
| तेल डबे | 11,000 | गॅस सिलेंडर | 3,000 |
| वनस्पती तेल | 9,000 | मिनरल वॉटर | 7,000 |
| मसाले व इतर वस्तू | 11,000 | तूप | 5,000 |
| ड्रायफ्रूटस् | 7,000 | पक्वान्न (गोड पदार्थ) | 25,000 |
| दूध | 4,000 | मजुरी अंदाजे | 50,000 |
| दही | 3,000 | | |

दिवाळी अंकासाठी आपली जाहिरात आपण संस्थेत प्रत्यक्ष, संस्थेच्या ई-मेलवर अथवा व्हॉटस्‌ॲप वर पाठवू शकता. जाहिरात लवकरात लवकर म्हणजे दि. 25 सप्टेंबर, 2024 पर्यंत पाठवून द्यावी, ही पुनश्च विनंती. कळावे, लोभ आहेच, वृद्धिंगत व्हावा, ही विनंती.

आपले स्नेहांकित,

| | | |
|---|---|---|
| **केदार जोशी** | **प्रसाद भिडे** | **मकरंद करंदीकर** |
| कार्यवाह | उपाध्यक्ष | अध्यक्ष |

**विशेष सूचना : जाहिरात दिल्यावर 8805355200 किंवा 7588839527 या मोबाईल नंबरवर कळवावे. आपली जाहिरात PDF किंवा JPEG फॉर्ममध्ये पाठवावी, यामुळे जाहिरातीच्या मजकुरातील चुका टाळता येतील.**

**संस्थेचा ईमेल : kolhapurchitpavan@gmail.com**

**मोबा. 7620546225**

• Regd. No. MAHMAR/2015/66822 Navsneha Monthly •
Posting Under Concessional Rate Regd. No. KLR-335/2022-2024


# SHOGINI TECHNOARTS PVT. LTD.

ISO 9001-2008
UL Approved

Manufacturers of Printed Circuit Boards
Metal Clad PCBs for LED applications.




- Manufacturing Excellence in Fabrication of Single Layer, Two Layer & Multilayer PCBs.
- Multilayer PCBs - Prototype & volumes.
- High density SMT, Fine Line Boards - 6 mil Tracks/0.25 mm Via holes.
- RoHS Compliance
- Top Class Testing facilities including Universal BBT with SMD Testing.
- Large Manufacturing Capacity 1,60,000 Sq. mtrs. per annum.
- Well equipped plant with ultra modern Machines
- Fastest Delivery at competitive price.
- Satisfied Customers all over India & Abroad.
- CAD-CAM, Prototype, Large Scale Production under one roof.

**Quality Approvals**
ISO 9001-2000 Certified & UL Approved
Also approved by C-DOT, BSNL, RDSO




**HEAD OFFICE :**
"SHOGINI" S. No. 5 (P) Katraj-Dehuroad By Pass, Near Sinhagad Road Flyover, Ambegaon Budruk, Pune 411046 (INDIA)
Tel.: +91 20 6647 1700 Fax. : +91 20 6647 1714

**FACTORY :**
Gat No. 788, Khed - Shivapur, Taluka Haveli, Dist. Pune 412 205. (INDIA) Tel. : +91 20 6647 1800
Fax. : +91 20 6647 1820

**E-mail :** info@shogini.com

**Visit us at :** www.shogini.com


प्रति,
सौ./श्री.

कोल्हापूर चित्पावन संघाचे हे मुखपत्र संपादक-मुद्रक-प्रकाशक श्री. सदानंद दिनकर मराठे यांनी
मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स, १३०५, ए वॉर्ड, शिवाजी पेठ, कोल्हापूर येथे छापून कोल्हापूर चित्पावन संघ, तुळजाभवानी संकुल,
गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ, कोल्हापूर येथून प्रकाशित केले आहे.